शनिवार । १८ ऑक्टोबर १९७५ । एक रुपया

# माणूस

गॉर्कीच्या कीर्तीनें स्वदेशाच्या सीमा तर केव्हाच ओलांडल्या होत्या. सोरॅण्टोसारख्या आडगावी रहात असूनही कीर्तीचा झोत सतत होताच. अनेक माणसे, अनेक पत्रे ... खेरीज तो जाईल तेथे माणसांचा थवा गोळा होत असे.

वयाला आता ५७ वर्षे झाली होती. आयुष्याची संध्याकाळ .... डोळे वारंवार भरून येत .... जीव फार हळवा झाला होता. पूर्वी कित्येक भीषण घटना पाहिल्या होत्या....पण आता साध्या गोष्टी पाहतानाही डोळे भरून येत. अहंता अजिबात नव्हती. कीर्तीविषयी तर तो संपूर्ण अलिप्त होता.

उतारवयातही गॉर्कीची प्रतिभा मात्र कार्यक्षम होती. त्याने एक नवी कादंबरी लिहायला घेतली. बोल्शेव्हिक क्रांतीविषयी संपूर्ण भ्रमनिरास झालेला नायक या कादंबरीत दाखविला आहे....

पण ?

पण गळचेपी करणारी यंत्रणा सुसज्ज होती. तिने अखेर गॉर्कीचाच बळी घेतला.

## मॅक्झिम गॉर्की

लेखिका : सुमती देवस्थळे

**यापुढील अंक : माणूस दिवाळी अंक**

**प्रसिद्धी : दिवाळीच्या सुमारास**

**सप्रेम नमस्कार....**

# इस्लाम संस्कृती परिचय लेखमाला : दोन प्रतिक्रिया

¤ आपल्या २७ सप्टेंबरच्या अंकात लेखिकेचा जो परिचय दिला आहे, त्यात आपण नमूद केले आहे की लेखिकेने ही प्रकरणे परीक्षेची टाचणे म्हणून संकलित केली होती. साहजिकच ह्या लेखात विचारांच्या परिपक्वतेची अपेक्षा करणे चूक ठरेल. 'माणूस'सारख्या साप्ताहिकाने ही लेखमाला प्रसिद्ध करणे ही घटनाच मुळी अभिमानास्पद आहे. लेखिकेच्या अनेक विधानांबद्दल मतभेद निर्माणही होतील; पण प्रत्युत्तरे जर खरोखरच विधायक असतील तर आणि त्यामुळे ह्या दोन समाजात सामंजस्य निर्माण होण्यास मदत होणार असेल तर माझी आपणास विनंती आहे, की ती प्रत्युत्तरे छापण्याचे आपण धाडस करावे. महाराष्ट्राच्या वैचारिक जगतात हे एक अपूर्व असे पर्व समजले जाईल. माझ्या अनेक हिंदू मित्रांना ही लेखमाला आणि तीही 'माणूस'मध्ये छापून येते आहे, हे पाहूनच आश्चर्याचा धक्का बसला. आपण घेतलेल्या निर्णयाचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. ह्यामुळे नव्या पाऊलवाटा निर्माण होतील. महाराष्ट्रातल्या अनेक मराठी भाषिक सुशिक्षित मुसलमानांकरिता नवी दालनं उघडली जातील. मराठी वृत्तपत्रे मुसलमानांसंबंधी लेख छापत नाहीत, हा आक्षेप हळूहळू कमी होत जाईल. मनात सलणाऱ्या विचारांना मोकळीक करून द्यावी असे अनेकांना अनेकदा वाटून गेले; पण जे सांगावयाचे होते ते मनातच राहून गेले, हा कढ अनेकांनी अनुभवला आहे. स्वातंत्र्योत्तर मराठी वृत्तपत्रांचे जर अवलोकन केले तर मोठ्या खेदाने म्हणावे लागते की मराठी वृत्तपत्रांनी हिंदू-मुसलमानांचे दंगेधोपे ह्यांची वर्णने करण्यातच शाई खर्ची घातली. त्यामुळे एकाची दुसऱ्याविषयी तिरस्काराची भावनाच बळावत गेली. आपण ज्या उद्देशाने प्रेरित होऊन ही लेखमाला प्रसिद्ध करीत आहात, त्यात सुखाचा अंश आहे म्हणून आपले अभिनंदन !

**ए. एस. खान, सोलापूर**

¤ इस्लाम संस्कृतीवरील चारही लेख वाचले. ज्या दृष्टिकोनातून ते लिहिले आहेत तो लक्षात घेता ते लेख उत्तम आहेत. माझी प्रतिक्रिया अशी.

१. एकदा कुराण व महंमद पैगंबर ह्यांची सुप्रीमसी मान्य केली की पुढील वैचारिक स्वातंत्र्य विशिष्ट मर्यादेत राहणार हे उघड आहे. फिशपॉटमधे माशांना असते तसे. त्या मर्यादेत ते लेख उत्कृष्ट वैचारिक पातळी दाखवितात.

२. विशिष्ट परंपरा व रूढी यांना भौगोलिक, सामाजिक परिस्थिती व विशिष्ट घटना यांची पार्श्वभूमी असते. तशी ती इस्लाम-परंपरा व रूढी यांनाही आहे. त्यांचे लाभ आणि तोटे दोन्ही असतात. जसे, बुरखापद्धतीमुळे दारिद्र्य, कुरूपता आणि सौंदर्य लपविता येते आणि पुरुषांना वाटणारे आकर्षण कायम ठेवता येते हा लाभ व स्वातंत्र्य व समान दर्जा राहात नाही हा तोटा. त्याला अध्यात्मिक उंची देण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. तसेच इतर रूढींचे.

३. बहुपत्नीत्वाबद्दल लिहिताना बहुपत्नीत्वाचा उल्लेख लेखिकेने विशेष शब्दांत केला आहे. बहुपतित्व ही धर्माने प्रतिपादन केलेली व्यवस्था नाही. ती एक विलक्षण अपवादात्मक घटना आहे. नियम नाही. उल्लेखच करायचा असेल तर धर्मशास्त्राप्रमाणे हिंदूतही बहुपत्नीत्व, राक्षसविवाह व इतर प्रकार आहेत हे लिहायला हवे होते.

४. चौथा लेख उघडउघड ठराविक ग्रंथांच्या आधाराने लिहिला आहे. त्यात सत्यापलाप, सत्याचे विकृतीकरण, अपसमजुती अक्षरशः ठासून भरलेल्या आहेत; **पण माझ्या मते हाच लेख सर्वांत महत्त्वाचा आहे. भारतीय मुस्लिमांच्या मनात कोणत्या कल्पना भरलेल्या असतात ह्याचे अत्यंत उत्कृष्ट चित्रण त्यात झाले आहे.**

त्यांनी हिंदूंना चांगली संस्कृती दिली, ज्ञानेश्वर-तुकारामांसारखे हजारो संत दिले, उत्कृष्ट राज्यपद्धती दिली, न्याय दिला, बंधुभाव दिला, संपत्ती दिली, खाण्यापिण्याच्या वस्तू, उत्कृष्ट वस्त्रप्रावरणे, उद्योग, स्थापत्य-कौशल्य, भाषा, संगीत तत्त्वज्ञान इ. इ. अनंत गोष्टी दिल्या. स्वतःच्या मूळ देशात यातले फारसे काहीही न करता केवळ भारताला हे दिले आणि त्यांना त्याबद्दल काय मिळाले ? केवळ कृतघ्न वागणूक ! ! कत्तली व जाळपोळीचे आरोप ! त्यांनी भारताला ज्ञानसंपन्न करण्याचा प्रयत्न केला आणि कृतघ्न हिंदूंनी त्यांच्यावर ग्रंथालये जाळून टाकल्याचा आरोप करावा ? हिंदूंना धड लढताही येत नव्हते. लढणारे लढायचे आणि बाकीचे स्त्री-पुरुष आपापले उद्योग करायचे. मुस्लिमांनी संपूर्ण युद्ध (Total war) कसे असते ते हिंदूंना दाखवून दिले. त्यांची संस्कृती श्रेष्ठ होती म्हणून त्यांचा भारतात सतत विजय झाला हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. अर्थात चेंगीजखान या बुद्धधर्मीय कत्तलबाजाने सर्व मुस्लिम देशांचा बेसुमार पराभव केला ते त्याची संस्कृती मुस्लिमांपेक्षा श्रेष्ठ होती म्हणून मात्र नव्हे हेही येथे लक्षात ठेवले पाहिजे. तसे असते तर त्याचा नातू उतरवयात इस्लाम धर्मानुयायी कसा झाला असता ? किंवा स्पॅनिश, ब्रिटिश, ज्यू ह्यांच्याकडूनही अनेकदा पराभव झाला म्हणून मुस्लिम संस्कृती कनिष्ठ ठरत नाही. सभ्य गृहस्थ व गुंडमवाली यांच्या भांडणात गुंडाचाच नेमका विजय होतो म्हणून का तो श्रेष्ठ ठरतो ?

तसे पाहिले तर या देशात हिंदूही बाहेरून आले (कुठून ? कधी ? कशावरून ? हे प्रश्न अप्रस्तुत आहेत.) आणि मुस्लिमही बाहेरून आले. कुणी कुणाला आक्रमक म्हणण्याचे कारण नाही. मुस्लिम आले. त्यांनी संस्कृती दिली. संपत्ती दिली. याच संपत्तीची माहिती ऐकून कोलंबस, वास्को वेगवेगळ्या मार्गांनी भारताकडे निघाले होते. शेवटी दरवडे सावकार-श्रीमंतांच्याच घरांवर पडतात.

एकूण हिंदूंचीच मने इतकी कोती आहेत की ती स्वतःच्या धर्मबांधवांची समानताही धड स्वीकारू शकत नाहीत तेथ इस्लामचे उपकार व श्रेष्ठत्व मान्य करायला त्यांना आणखी किती शतके लागतील ते एक खुदाच जाणे !

**—वि. शि. शेणवाई, नागपूर**

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : एकोणीसावा

१८ ऑक्टोबर १९७५

मूल्य : एक रुपया



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

□



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथें छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□


# केसरीचे नवे ध्येय

श्री. मा. भावे

महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशा ज्या अनेक गोष्टी आहेत त्यात शिवाजीमहाराजांनंतर ' केसरी 'चाच क्रम लावावा लागेल. त्या वर्तमानपत्राची थोर परंपरा सर्वांना माहीत आहेच; परंतु आनंदाची गोष्ट ही की ही परंपरा अजून इतिहासजमा झालेली नसून आजही ' केसरी 'चा बाणा टिकून आहे. हे विचार मनात येण्याचे कारण म्हणजे अमेरिकेतील सध्याच्या परिस्थितीचे परखड व मर्मग्राही विश्लेषण करून अध्यक्ष फोर्ड यांना त्या देशात आणीबाणी पुकारण्याविषयी सल्ला देणारा केसरीचा अग्रलेख हे होय.

अमेरिकेचे अध्यक्ष फोर्ड यांच्यावर जे खुनी हल्ले होत आहेत त्यांची मीमांसा करताना अमेरिकेच्या दुखण्यावर ' केसरी 'ने अचूक बोट ठेवले आहे. ते दुखणे म्हणजे अमेरिकेतील वाढती संपत्ती आणि बेबंद व्यक्तिस्वातंत्र्य. यामुळे अमेरिकेत गुन्हेगारी व अत्याचार वाढत असून यावर उपाय म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आणणे हा होय. या दृष्टीने भारतातील आणीबाणीचा अनुभव श्री. फोर्ड यांना उपयोगी ठरेल असेही ' केसरी 'ने म्हटले आहे.

भारतात सर्वत्र सी. आय. ए. चे हेर पसरलेले आहेत असे ऐकतो. त्यापैकी कोणी या अग्रलेखाचे भाषांतर करून फोर्डसाहेबांस देईल व त्यानुसार फोर्डसाहेबांचे वर्तन होईल तर अमेरिकेवर फार उपकार होतील यात शंका नाही. तथापी असे होण्याची शक्यता फार कमी आहे. कारण अधोगतीला चाललेल्या अमेरिकेत आणीबाणीचे वज्र उचलण्यास समर्थ असा राजकीय नेता निर्माण होणे कठीणच. शिवाय स्वतंत्र बाण्याची आणि निर्भीड व परखड विचार प्रसृत करणारी केसरीसारखी वृत्तपत्रे तरी तेथे कोठे आहेत ?

परंतु अध्यक्ष फोर्ड यांना सल्ला देताना ' केसरी 'ने थोडा उशीर केला आहे. त्यापूर्वीचे अध्यक्ष निक्सन यांच्या वेळची परिस्थिती आणीबाणीसाठी अधिक समर्थक होती. कशी ते पहा.

श्री. निक्सन हे पुरोगामी विचाराचे अध्यक्ष होते. त्यांनी रशिया व चीन या साम्यवादी राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध वाढविले होतेच; पण व्हिएतनाममधील युद्धही संपवत आणले होते. साहजिकच भांडवलवादी वर्तमानपत्रे आणि खाजगी मालकीच्या टेलिव्हिजन व रेडिओ कंपन्या यांचा त्यांच्यावर राग झाला. त्यातून आपल्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षात अमेरिकेचे जुनाट आर्थिक धोरण बदलून गॅलब्रेथसारख्या पुरोगामी विचारवंतांनीही ज्याची स्तुती करावी असे नवे आर्थिक धोरण त्यांनी आखले होते. साहजिकच मूठभर भांडवलदारी वृत्तपत्रे आणि हितसंबंधी गट यांनी त्यांना खाली खेचण्याचा प्रयत्न करण्यास सुरुवात केली.

या वर्तमानपत्रांनी व विरोधी गटांनी श्री. निक्सन यांनी निवडणुकीत गैरप्रकार केले अशी ओरड करण्यास सुरुवात केली. वॉटरगेट या इमारतीतील विरोधी पक्षांची कचेरी श्री. निक्सन यांच्या पाठीराख्यांनी फोडली अशी क्षुद्र प्रकरणे प्रसिद्ध केली. वास्तविक श्री. निक्सन हे फार मोठ्या बहुमताने निवडून आले होते. वॉटरगेट प्रकरणाशी त्यांचा असलेला संबंध केवळ तांत्रिक स्वरूपाचा होता. त्या प्रकरणामुळे त्यांच्या निवडणुकीवर काही परिणाम झाला असता असेही नाही; पण व्यक्तिद्वेषाने अंध झालेल्या भांडवलदारधार्जिण्या वर्तमानपत्रांनी या गोष्टींचा विचार केला नाही आणि बिचाऱ्या निक्सनवर निरर्गल टीकेचा वर्षाव केला.


बहुतेक सर्व ठिकाणी न्यायालये ही प्रतिगामीच असतात. जनमताची दखल घेऊन पुरोगामी कायद्यांना पाठिंबा देण्याचे शहाणपण त्यांना सुचतेच असे नाही. अमेरिकेतील न्यायाधीश श्री. सिरिका यांचाही वरील विधानाला अपवाद नव्हता. त्यांनी वॉटरगेट प्रकरणाचा पाठपुरावा चालविला. विरोधी

पक्षांची प्रसिद्धियंत्रणा व मूठभर चळवळ्यांचे उपद्व्याप यांच्या दडपणाला ते बळी पडले. त्यांनी हे ध्यानात घ्यावयास हवे होते की निक्सन यांचा गुन्हा तांत्रिक स्वरूपाचा होता. फार मोठे मूक-बहुमत निक्सन यांच्या पाठीशी होते. निक्सन या व्यक्तीचा प्रश्न नसून किंवा कायद्यांतील मुद्दांचा कीस काढण्याचा प्रश्न नसून निक्सन यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेने स्वीकारलेल्या पुरोगामी धोरणांच्या भवितव्याचा प्रश्न होता; पण या कोणत्याच गोष्टी न्यायालयाने विचारात घेतल्या नाहीत आणि खटला काढून न टाकता पुढे चालविला.

याहून दुर्दैवाची गोष्ट म्हणजे श्री. निक्सन यांचेही धैर्य या टीकेच्या माऱ्यापुढे कोलमडले. आपण सत्तेला चिकटून राहिलो हा आरोप आपणावर होऊ नये व दूषित राजकीय वातावरण शुद्ध व्हावे म्हणून त्यांनी राजिनामा दिला. खरे पाहता ध्येयवादी आणि सामान्य जनतेच्या समृद्धीसाठी झगडणाऱ्या नेत्याने अशा आरोपांना न भिता काम करत राहिले पाहिजे. बावनकशी नेतृत्वाची हीच परीक्षा आहे; पण या परीक्षेत निक्सन टिकले नाहीत व अध्यक्षपदावरून दूर झाले.

हा इतिहास काही फार जुना नाही. बहुतेकांना या गोष्टी आठवत असतील; परंतु हे सर्व घडत असताना आपण त्याकडे निराळ्या दृष्टीने पाहत होतो. त्या इतिहासाकडे पहाण्याची ही नवी दृष्टी केसरीच्या अलिकडच्या अग्रलेखांनी दिली. 'कृण्वन्तो विश्वम् आर्यम्' असे आर्यांचे घोषवाक्य होते. आधुनिक भारतातील पुरोगामी विचारांच्या अग्रभागी असणाऱ्या 'केसरी'चे घोषवाक्य 'आणीबाणी जगी पसरवा' असे आहे. श्री. निक्सन व अमेरिका यांच्या दुर्दैवाने 'केसरी'ला हे नवे तत्त्व एक वर्ष उशीरा सुचले.

□



### साहित्यपरिषदेतील एक संध्याकाळ

# दुर्गा भागवतांचा सत्कार

प्र. मा. अकलूजकर

रविवारची ५ ऑक्टोबरची संध्याकाळ. साहित्यपरिषदेचे पटवर्धन सभागृह. एरवी इथे साडेसहा वाजता कार्यक्रम असला की सात वाजेपर्यंत निम्मे सभागृहही भरत नाही! आज मात्र पावणेसहालाच हॉल गच्च भरलाय. श्रोत्यांची गर्दी अपेक्षित म्हणून बाहेरच्या बाजूला लाउडस्पीकरचीही सोय होती. मंडळी उत्सुक होती दुर्गाबाई भागवतांना पाहायला. ऐकायला. दुर्गाबाई कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्ष म्हणून निवडून आल्याबद्दल आनंद व्यक्त करायला साहित्यपरिषदेने ही सत्कारसभा आयोजित केली होती.

सभागृह दुर्गाबाईंच्या चाहत्यांनी, साहित्यिकांनी, पत्रकारांनी, टीकाकारांनी भरलं होतं. प्रमुख मंडळींत व्यंकटेश माडगूळकर, श्री. ज. जोशी, ज्योत्स्नाबाई देवधर, प्रा. अशोक केळकर, प्रा. स. शि. भावे, रा. श्री. जोग, श्री. ग. मुणगेकर, श्री. ग. माजगावकर इ. बरीच साहित्यिक पत्रकार मंडळी होती. साडेसहाची सभा थोडी अगोदरच सुरू झाली. प्रास्ताविक अर्थातच नेहमीप्रमाणे डॉ. भीमराव कुलकर्णी यांचं होतं. परिषदेतर्फे त्यांनी बाईंच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करून सत्काराचे प्रयोजन स्पष्ट केले. राजारामशास्त्री भागवतांचा वारसा घेऊन आलेल्या व केतकरांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवणाऱ्या दुर्गाबाईंचे लेखन हे प्रखर वैचारिक धारणा असलेले आहे असे सांगून त्यांनी सभेची सूत्रे अध्यक्ष गं. बा. सरदार यांच्याकडे दिली. प्रा. सरदार आजच्या सभेचे अध्यक्ष होते. बोलणाऱ्यांमध्ये आनंद यादव, रा. ज. देशमुख, डॉ. भालचंद्र फडके आणि मालतीबाई बेडेकर अशी मातब्बर मंडळी होती.

**दुर्गाबाईंच्या ललितलेखनाचा शोध!**

सुरुवातीलाच आनंद यादव बोलले. यादवांच्या म्हणण्याप्रमाणे साहित्यपरिषदेच्य प्लॅटफॉर्मवरून ते प्रथमच बोलत होते. ह प्रथमच बोलण्याचा प्रसंग तसा संस्मरणी ठरला. दोन्ही अर्थाने. यादव चांगले बोलले; पण सर्वसाधारण श्रोत्यांना ते रुचणारे आणि पचणारे नव्हते. त्यामुळे थोडा वेळ ऐकू घेतलेल्या श्रोत्यांनी 'हुश! हुश!' करू टाळ्या वाजवायला सुरुवात केली. यादवांनी इथे चक्क 'दुर्गाबाई : व्यक्ती आणि वाङमय या विषयावरचा तासच सुरू केला.

यादव म्हणाले, 'दुर्गाबाईंच्या फक्त ललितलेखनाबद्दल मी बोलणार आहे. 'पैस', 'भावमुद्रा', 'ऋतुचक्र' कुठलंही पुस्तक घ्या. बाईंच्या पुढे लेखनाचा ठराविक फॉर्म होता असं दिसत नाही. आपल्या परंपरागत ललितलेखनापेक्षा हे लेखन वेगळे आहे. ऋतुचक्रचेच उदाहरण घ्या. ऋतूंची गतिमानपद्धतीने रेखाटने इथे आहेत. निसर्ग पाहताना, अनुभवताना होणारा मनाचा भावनिक उद्रेक इथे आहे. 'पैस'मध्ये भारतीय इतिहास, पुराणे, तीर्थक्षेत्रे, प्राचीन विचारधारा यासंबंधीचे अनुभव आहेत. 'पैस' म्हणजे सर्व पुस्तकांतील लेखनगुण एकत्र झालेले पुस्तक आहे. अधिक समृद्ध व्यक्तित्व इथे पाहावयास मिळते.' यादवांनी बाईंच्या प्रत्येक पुस्तकाचा एकमेकांशी कसा आंतरिक संबंध आहे ते स्पष्ट केलं. ललितलेखनातील त्यांचे वेगळेपण सांगताना व्यासपर्व आणि ऋतुचक्रचा गौरवाने उल्लेख केला. हे बोलत असताना यादवांनी आजच्या समीक्षेच्या भाषेला (पर्यायाने समीक्षकांना) व श्रोत्यांनाही अप्रत्यक्ष चिमटे काढले. शेवटी दुर्गाबाईंच्या व्यक्तित्वाबद्दल बोलताना यादव म्हणाले, 'कुठलाही साधा प्रसंग असो, क्षुल्लक विषय असो, तो अनुभवताना मनाची होणारी तप्तावस्था व्यक्त करू पाहाण्याच्या मनःस्थितीचे हे सारे लेखन

आहे. कुठल्याही लेखनात उद्रेक झालेल्या मनाला त्या वाट करून देतात. त्यामुळे हे लेखन म्हणजे कोणताही भूतकाळातील अनुभव नसतो. ते लेखन, तो अनुभव वर्तमानकाळात चालत आलेला असतो, असा प्रत्यय मला त्यांचं लेखन वाचताना येतो.' यादवांनी एवढे चांगले भाषण करूनही श्रोत्यांनी जो 'प्रतिसाद' दिला त्याची आठवण ठेवूनच डॉ. भालचंद्र फडके बोलले, अगदी मोजके आणि नेटके. तेही फक्त दुर्गाबाईंच्या कथेबद्दल आणि व्यक्तित्वाबद्दलच. फडके म्हणाले, 'दुर्गाबाईंची अन् माझी वैयक्तिक ओळख नाही. जी ओळख झालीय ती त्यांच्या वाङ्मयातूनच. त्यांच्या कथा वाचताना, विशेषत: 'महानदीच्या तीरावर' ही कथा वाचताना जाणवलेली त्यांची भूमिकाच सर्वत्र जाणवते. ही भूमिका 'माणूस शोधण्याची आहे.' 'रिता' कथेचे उदाहरण देऊन फडके म्हणाले, 'दुर्गाबाईंचे सारेच लेखन स्त्रीविषयक चिंतनाचे आणि माणूसपणाचा शोध घेणारे आहे.' फडके थोडंच बोलले; पण त्यांना मिळालेला टाळ्यांचा प्रतिसाद अनुकूल होता.

### ढोंग-विध्वंसक, फटकळ दुर्गा

डॉ. फडक्यांच्यानंतर मालतीबाई बेडेकर बोलल्या. बाई अगदी मोकळेपणाने बोलल्या. मानत आलं ते सांगून टाकलं. त्यांच्या बोलण्यात दुर्गाबाईंबद्दलचा आदर आणि आपलेपणा दोन्ही होता. मधूनच त्या मिस्किलपणे बोलत होत्या आणि येथवर निर्विकारपणे सारा गुणगौरव ऐकणाऱ्या दुर्गाबाईंच्या चेहऱ्यावर त्यामुळे हास्याची लकेर उमटून जात होती. मालतीबाई म्हणाल्या, 'मला दुर्गाबाईंच्या आईचं मोठं कौतुक वाटतं. त्यांच्या आईला मुलीचे पाय पाळण्यातच दिसले असावेत. म्हणून 'दुर्गा' नाव ठेवलं! ही बाई माझ्यापेक्षा वयाने लहान आहे; पण तिच्या विद्वत्तेबद्दल मला आदर वाटत आला आहे. तसंच तिच्याबद्दल एक प्रकारचं कुतूहलही वाटत आलंय. चहा पिताना व्यवहाराच्या पातळीवर आम्ही गप्पा मारायला लागलो की वाटतं की हीच का ती विद्वान बाई? मला कुठलीही ज्ञानाची गरज लागली की मी या बाईकडे जाते. रॉयल एशियाटिक सोसायटीत या बाईची ज्ञानसाधना चालू असते. एका मोठ्या टेबलावर पाय पसरून ही बाई बसलेली दिसते. भोवताली तिथे भक्तगण जमलेले असतात.'

या ब.ईचं मोठं विचित्र आहे. ती फटकळ आहे. व्यवहाराच्या पातळीवर ढोंगीपणाचा विध्वंस करणारी आहे. तिला कुठल्याच अधिकाराची अपेक्षा नाही. उद्या ही साहित्य अकादमीत गेली तर सांगेल की म्हाताऱ्यांना येथून बाहेर काढा. तरुणांची इथं गरज आहे! कुठलाही माणूस तिच्याकडे जावो ती आपलेपणाने चौकशी करणार. उद्या वेश्या जरी काही गाऱ्हाणं घेऊन गेल्या तर त्यांना 'मान्यता द्या' असं त्या म्हणतील. ही बाई लहान आहे की वृद्ध आहे, की विद्वान आहे याचं कुतूहल मला सतत पडलेलं आहे.' मालतीबाई दुर्गाबाईंबद्दल इतक्या मनमोकळेपणाने व तितक्याच आपलेपणाने बोलत होत्या की दुर्गाबाईसारख्या निर्विकार चेहऱ्याच्या विद्वान बाईनंही मधूनच हसून त्याला 'दाद' दिली.

दुर्गाबाईंच्या स्वभावाबद्दल, व्यक्तित्वाबद्दल बोलून मालतीबाई साहित्याकडे वळल्या. 'संशोधकवृत्ती असूनही लेखनाला ललिताचे लेणे आहे. निसर्गातील अनेक तऱ्हेचे वास त्यांना येतात. जे दिसतं ते नजरेतून सुटत नाही. वाहणाऱ्या वायूला रूप नसलं तरी त्याची जाणीव तिला होते. आकाशातील ग्रहतारे काहीही असो, सर्वांशी त्या बोलतात. भान हरपून बोलतात. मला तर असं वाटतं की एकदा त्या असंही म्हणतील की, 'मला म्हणायचं ते शब्दात मावत नाही' शब्दामागून शब्द जेव्हा त्या लिहितात तेव्हा मोत्यांच्या सरीप्रमाणे ती वाक्ये आपल्यापुढे येतात. या बाईला त्याची जाणीवच नसते!' शेवटी त्यांच्या विद्वत्तेबद्दल बोलताना मालतीबाई म्हणाल्या, 'त्यांची विद्वत्ता इतकी अफाट असूनही ती गुदमरवून टाकणारी विद्वत्ता नाही! शिवाय ज्ञानाच्या बाबतीत इतका प्रामाणिकपणा आज कुणाच्यात नाही! एखादी गोष्ट माहीत नसेल तर नाही म्हणून सांगतील किंवा चुकीची सांगितली तर उद्या दुरुस्त करून सांगेन असे त्या तिथल्या तिथे सांगतील!'

मालतीबाईंच्या नंतर प्रा. गं. बा. सरदार यांनी अध्यक्षीय भाषण केलं. आपण ललितवाङ्मयाचे अभ्यासक नाही त्यामुळे त्यांच्या

## वर्गणीदारांसाठी

- वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो, ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी दि. २४।१०।७५ पूर्वी दीड रुपया पाठवावा.
- अंक व्यवस्थित मोजून पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठवू.
- ज्यांची वर्गणी २५ ऑक्टोबरपूर्वी संपत असेल त्यांनी वर्गणी लगेच रवाना करावी म्हणजे त्यांना दिवाळी अंक पाठवता येईल.
- जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी २४।१०।७५ पूर्वी तसे कळवावे.

**व्यवस्थापक**

साहित्यावर मी बोलणार नाही असे त्यांनी अगोदरच सांगून टाकले. सरदारहीमोजके पण उचित बोलले. ते म्हणाले, 'फक्त भावना व्यक्त करण्यासाठी मी प्रतीकात्मक भाषण करणार आहे. माणूसपणाची जाण असलेली ही बाई आहे. रौद्रपणा आणि कोमलपणा दोन्हीही त्यांच्यात आहेत. त्यामुळे एकाच वेळी भीती आणि प्रेम दोन्हीही वाटते. मानसन्मानाकडे त्या स्वतःहून कधीच गेल्या नाहीत. तत्त्वनिष्ठेमुळे पीच. डी. मिळाली नाही तरी त्याचंही त्यांना काही वाटत नाही. एखाद्या लहान मुलासारखा हळवा चेहरा असलेल्या या बाई चिडल्या की भडाभडा बोलणार ! मग प्रश्न पडतो की भावनेची सूक्ष्मता त्यांच्या लेखनात येते कुठून ? एकाच वेळी तर्ककर्कशता व हळुवारपणा दोन्हीचा संगम त्यात कसा दिसतो ? ही किमया त्यांच्या प्रतिभेची आहे.'

दुर्गाबाईंच्या वैयक्तिक जीवनाबद्दल व स्वभावाबद्दल बोलताना सरदार म्हणाले, 'स्वतःचा संसार त्यांनी कधी केला नाही पण त्यांच्या भोवती मोठा संसार जमलेला आहे. कुठेही गेल्या तरी त्या तेथे स्वयंपाक करतील. चांगला करतात त्या स्वयंपाक ! एकदा अनुभव घेतलाय मी त्याचा ! त्यांचा मोठेपणाही असाच आहे. त्याबद्दल कधी दरारा वाटत नाही आणि ज्याचा दरारा वाटतो तो खरा मोठेपणा नव्हेच ! या बाई क्षणात मोठेपणा बाजूला सारू शकतात. निर्भयपणे कुठलाही पवित्रा घ्यायला तयार असतात.'

सरदारांच्या भाषणानंतर दुर्गाबाई बोलल्या. सत्कारास उत्तर देताना प्रथमच त्यांनी सांगितलं की नेहमीच आपण साहित्याबद्दल बोलतो. आज साहित्य आपण बाजूला ठेवू या. ज्या साहित्याचा आणि वातावरणाचा संबंध आहे त्याबद्दल बोलू या. आणि बाई खरंच इतिहासाबद्दल, पुराणवस्तू-स्थानांबद्दल, अवशेषांबद्दल, समाध्यांबद्दल बोलू लागल्या. सुरुवातीला अगदी सहजपणे स्वतःबद्दल बोलल्या. त्या म्हणाल्या–

'आत्ताच मालतीबाई माझ्या नावाबद्दल बोलल्या; पण त्याचं स्पष्टीकरण करते. हे नाव आईनं ठेवलेलं नाही. कारण मी जन्माला आले तेव्हा माझ्या कपाळावर दोन आठ्या होत्या आणि मधूनच चेहऱ्यावर हसू दिसे. ते पाहून आमच्या सर्जननं माझं नाव दुर्गा ठेवा असे सांगितलं. हे नाव बदलण्याबद्दल आईजवळ मी कधीच आग्रह धरला नाही आणि पुढे दुसऱ्या कुणाला बदलण्याची संधीही दिली नाही. (हशा) मी माझ्या आईला प्रॉब्लेमच होते. लहानपणी मी फार खोडकर होते. आईशी भांडायची. आजीनंच मला सांभाळलं.' असे थोडेसेच स्वतःबद्दल बोलून त्या एका वेगळ्याच विषयावर बोलू लागल्या. त्यांच्या बोलण्यात कळकळ होती, परखडपणाही होता. बाईंनी पुणेकरांची हजेरीही घेतली. पुण्यातील आणि आसमंतातील ऐतिहासिक स्थाने, त्यांची दुर्दशा, तेथील अस्वच्छता यावर त्यांनी कडाडून हल्ला चढवला. त्या म्हणाल्या, 'साहित्य आणि वातावरणाचा संबंध जवळचा आहे. आज जे मी बोलणार आहे तो विचार पुण्याच्या कानाकोपऱ्यात घुमवा ! पुण्यानं खूप चांगलं दिलंय. ज्या पुण्यानं इतिहास घडवलाय त्या पुण्यातील ऐतिहासिक अवशेषांना आपण जपलं पाहिजे. हे अवशेष लहान-सहान असोत, हे अवशेष दगडांचे असोत किंवा कागदपत्रांचे. ते आपण जपले पाहिजेत. हे आपण जर जपले नाहीत तर आपल्या अस्तित्वाचे पायच पुसून टाकले जातील व आपण त्यावर डळमळीतपणे उभे राहू.'

'बाईंनी हळूहळू हजेरी घ्यायला सुरुवात केली. नारायणराव, माधवराव यांची समाधी, सतीचे स्थान, शिवाजीची समाधी या सर्वांची आपण जी अक्षम्य उपेक्षा चालवली आहे त्याबद्दल खेद व्यक्त करून त्यांनी कठोर हल्ला चढवला. 'माधवरावांची समाधी कशीबशी जतन केलीय. सतीच्या स्थानाजवळ तर प्रचंड गलिच्छपणा आहे, अस्वच्छता आहे. सतीच्या स्थानाइतकी दुर्गती मी कुठेच पाह्यली नाही. एक दगड, लहान दगड असला तरी तो आपण जपला पाहिजे. शेंदूर लावलेला म्हसोबा तुम्ही जपता ! कारण तो कोपेल अशी तुम्हाला भीती वाटते ! ही बिचारी सती काय करणार ?'

'थेऊरच्या समाधिस्थानाजवळची नदी पाहा, हिरव्या वनस्पतीने ग्रासलीय. हा हिरवा क्षय आहे. ज्या नदीच्या साक्षीने पुण्याचा इतिहास घडला ते पात्र गलिच्छ आहे. निसर्गाची स्थानं स्वच्छ पाहिजेत. नदीचं पाणी धोधो वाह्यलं पाहिजे, आरशाप्रमाणे त्यात स्वच्छ प्रतिबिंब पाहता आलं पाहिजे.' या संदर्भात बाईंनी शिवाजीची समाधी किती उपेक्षणीय बनली व उलट अफझलखान, औरंगजेब यांच्या समाध्या किती स्वच्छ, सुंदर ठेवल्यात ते सांगितलं. जाता जाता केतकरसमाधीबद्दलचा कटू अनुभव सांगून पुणेकरांशी आपण सतत सहा वर्षे का व कसे भांडलो तेही सांगून टाकले.

**'माधवरावांचे कारुण्य जपा'–दुर्गाबाई**

'माधवरावांच्या जीवनावरची कादंबरी गाजली. आज तीन नाटकें निघालीत. या नाटकांनी तीन प्रयोगांचा पैसा दिला तरी ही समाधिस्थाने सुंदर होतील. नुसते 'संस्कृतीचे गोडवे' गाऊन करायचंय काय ? इतिहास हवा तर ऐतिहासिक स्थानांना जपले पाहिजे. हा भाग एन्व्हायरन्मेंटचा आहे. वातावरणाचा आहे. या चांगल्या वातावरणात आपले लेखक रमले नाहीत तर त्यांचे लेखन निर्जीव होईल. कारण लेखक स्वतःच्या पिढीकरता जगत नाही, लिहीत नाही तर पुढल्या पिढीकरिता लिहितो-जगतो. तेव्हा या स्थानांचा जीर्णोद्धार करा. साखरकारखानदारांकडून पैसे घ्या. म्युनिसिपालिटीचं डोकं धरा; पण ही स्थाने जपा ! हा विचार एकट्या दुर्गाबाईंचा नाही. एका दुःखी स्त्रीचा आहे. शेवटी सांगायचं म्हणजे माधवरावांचं हे कारुण्य आपण जपलं पाहिजे. इतिहासाचा समृद्ध अनुभव घेत आपण जगलं पाहिजे !'

असा हा दुर्गाबाईंचा सत्कारसोहळा श्रोत्यांच्या उपस्थितीने, वक्त्यांच्या भाषणांनी आणि दुर्गाबाईंच्या परखड भाषणाने चांगलाच संस्मरणीय ठरला. □ □



VP-735

# साखारोव्ह

## मॉस्कोच्या सत्ताधाऱ्यांशी संघर्ष

वा. दा. रानडे

रशियन शास्त्रज्ञ साखारोव्ह यांना या वर्षाचे शांततेचे नोबेल-पारितोषिक देण्यात आले आहे. गेल्या वर्षी रशियन लेखक सोल्झेनित्सिन यांना साहित्याचे नोबेल-पारितोषक मिळाले होते. सोल्झेनित्सिन आणि साखारोव्ह हे दोघेही प्रस्थापित रशियन राजवटीचे आणि तिच्या विचारप्रणालीचे विरोधक आहेत व त्यांच्या साहित्य आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील कार्यापेक्षा या राजकीय विरोधामुळेच ते अधिक विख्यात झाले आहेत.

साखारोव्ह रशियन हैड्रोजन बाँबचे जनक; पण नंतर जागतिक शांततेसाठी सर्व प्रकारच्या अण्वस्त्रनिर्मितीस बंदी केली पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतली आणि क्रुश्चेव्ह यांच्या काळापासूनच तिचा ठामपणे पुरस्कार ते करू लागले. त्यांच्या या कार्याबद्दलच यंदाचे नोबेल शांतता पारितोषक त्यांना देण्यात आले आहे. साखारोव्ह यांच्या या भूमिकेबद्दल मतभेद व्हायचे कारण नाही; पण रशियात त्याचे स्वागत होणार नाही. आमच्या राजवटीच्या विरोधकाला या पारितोषकासाठी निवडण्यामागे राजकीय उद्देश आहेत अशी मॉस्कोची प्रतिक्रिया आहे.

साखारोव्हसारखी बुद्धिवान माणसे प्रस्थापित रशियन राजवटीची विरोधक का बनतात हा कम्युनिस्ट चळवळीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचा विचार करण्यापूर्वी साखारोव्ह यांची वैचारिक भूमिका प्रथम समजून घेतली पाहिजे.

आपली वैचारिक भूमिका स्पष्टपणे मांडणाऱ्या साखारोव्ह यांच्या आगामी पुस्तकातील उतारे 'डर स्पेगेल' या पश्चिम जर्मन नियतकालिकाने प्रसिद्ध केले आहेत. पाश्चात्य राष्ट्रात हे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल; पण त्यातील जे उतारे प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून साखारोव्ह यांचे प्रस्थापित रशियन राजवटीशी मतभेद कोठे आहेत याची कल्पना येते. रशियात मिश्रअर्थव्यवस्था पुन्हा आणावी आणि पश्चिम जर्मनी, नॉर्वे, स्वीडन यांच्याप्रमाणे सोशलडेमॉक्रसी म्हणजे लोकशाही मार्गाने समाजवाद आणण्याचा प्रयोग करावा अशा सूचना त्यांनी केल्या आहेत. यापैकी पहिली म्हणजे मिश्रअर्थव्यवस्थेची सूचना कम्युनिस्टांना तर नाहीच; पण समाजवाद्यांनाही मान्य होणार नाही. मिश्रअर्थव्यवस्था हा समाजवादाकडे जाण्याचा एक मधला टप्पा असतो. रशियाने तो केव्हाच ओलांडला असता आता पुन्हा मिश्रअर्थव्यवस्थेकडे येणे म्हणजे समाजवादाकडून भांडवलशाहीच्या दिशेने मागे पावले टाकणे होय. त्यांची दुसरी सूचना लोकशाही मार्गाने समाजवाद आणण्याची. लोकशाही समाजवाद हे उदात्त उद्दिष्ट आहे. लोकशाही आणि समाजवाद या दोन्ही प्रणालींमधील अपप्रवृत्ती टाळून चांगल्या गोष्टी घ्यावयाच्या आणि त्यांचा समन्वय साधायचा ही लोकशाही समाजवादामागील मुख्य कल्पना आहे–असली पाहिजे. साखारोव्हना पाश्चात्य पद्धतीची लोकशाही अभिप्रेत आहे. केवळ सर्व प्रौढांना मताधिकार मिळाल्याने खरी लोकशाही येत नाही. निवडणुकांत पैशाचा वापर फार मोठ्या प्रमाणात केला जातो आणि धनिकवर्ग पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकू शकतो आणि समाजवादी पक्षांनी निवडणुका जिंकल्या, काही उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले तरी प्रत्यक्ष समाजवाद आणण्याच्या दृष्टीने ते विशेष काही करू शकत नाहीत. अर्थव्यवस्थेवरील आणि सत्तास्थानांवरील भांडवलदारवर्गाची पकड कायमच राहते असा अनुभव ब्रिटन व युरोपातील इतर देशांत आलेला आहे. समाजवादाच्या दिशेने क्रांतिकारक पावले टाकली तर प्रतिगामीवर्ग उठाव करतात आणि लोकशाही गुंडाळून ठेवून सत्ता हाती घेतात असा अनुभव स्पेन आणि चिलीमध्ये आलेला आहे. पाश्चात्य लोकशाहीत हे दोष असतील; पण कम्युनिस्टांची समाजवादी लोकशाहीही निर्दोष नाही. तिला त्यांनी लोकशाही नाव दिले असले तरी प्रत्यक्षात ती एका पक्षाची हुकुमशाही असते आणि तिला बऱ्याच वेळा एका व्यक्तीच्या हुकुमशाहीचे स्वरूप येते. पक्षाचे निर्णय लोकशाही पद्धतीने घेतले जातात असे बाह्यतः दिसते; पण खालपासून वरपर्यंत खुली चर्चा आणि आत्मटीकेच्या पद्धतीने निर्णय घेतले जाण्याऐवजी वरिष्ठ नेत्यांचे निर्णयच मान्य केले जातात. रशियन क्रांतीस ५८ वर्षे झाल्यानंतरही कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर पक्षांना तर तिथे वाव नाहीच; पण सत्तारूढ नेत्यांच्या धोरणावर उघड टीकाही करता येत नाही. असा विरोध केला तर ती व्यक्ती पक्षद्रोही, जनताद्रोही, प्रतिगामी व भांडवलदारवर्गाची हस्तक ठरते. सर्व महत्त्वाच्या अधिकारपदांवरून तिची हकालपट्टी होते. स्टालिनच्या काळातील दहशत गेली असली तरी खुल्या टीकेला रशियात अजूनही वाव नाही. अनेक वर्षे अशा वातावरणात वावरावे लागल्याने पाश्चात्य लोकशाहीचा पुरस्कार साखारोव्ह यांनी केला असणे शक्य आहे. पाश्चात्य लोकशाहीच्या दोषांची त्यांना जाणीव नाही असा त्याचा अर्थ नाही.

'मला माझ्या देशाची काळी प्रतिमा रंगवायची नाही; पण रशियातील परिस्थितीकडे लक्ष वेधले पाहिजे असे मला वाटते.' असे सांगून साखारोव्ह म्हणतात, 'आर्थिक मंदी, तेलाचा पेचप्रसंग, मोठ्या प्रमाणावरील बेकारी यांना तोंड देत असताना पाश्चात्य राष्ट्रांत आज जी परिस्थिती आहे त्यापेक्षाही वाईट परिस्थिती रशियात आहे. मोठ्या प्रमाणावरील लष्करी खर्चामुळे आर्थिक स्थिती बिकट आहे.' नोकरशाहीच्या गैरकारभाराकडे त्यांनी लक्ष वेधले असून वरिष्ठ अधिकारीवर्गाचे रहाणीमान उंच राखण्यासाठी पैसा कसा खर्च केला जातो याची माहिती दिली आहे. बहुसंख्य जनतेच्या जीवनासंबंधी साखारोव्ह म्हणतात, 'असमाधानी लोकांचे प्रमाण फार मोठे आहे. अनेकजण मनामध्ये आपले दुःख बुडवितात. झारच्या काळात मद्याचा खप जेवढा होता त्यापेक्षा आज मद्याचा खप तिप्पट वाढला आहे.' ज्यांना उपचार मिळत नाहीत अशा आजारी लोकांचा उल्लेख त्यांनी केला आहे. कैद्यांसंबंधी ते लिहितात. 'आंधळ्या व अन्याय्य न्याययंत्रणेचा बळी झालेले पंधरा लाख कैदी आज रशियात आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रतीक्षागृहात लोक आपली गाऱ्हाणी मांडण्या-

साठी तासन् तास तिष्ठत बसतात. त्यांच्यापैकी जे आपली दाद लागावी म्हणून आग्रह धरतात त्यांना सरळ तुरुंगात नेण्यात येते. रशियात आज पगार एवढे थोडे आहेत की स्त्रियांना कष्टाची अवजड कामे करणे भाग पडते. त्याचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होत आहे. स्त्रियांनी काम करूनही मुलांना पुरेसे अन्न देण्यास पैसा अपुरा पडतो. गुन्हे हळूहळू वाढत आहेत.'

रशियातील जीवनाचे असे निराशाजनक चित्र साखारोव्ह यांनी रेखाटले आहे. रशियन वृत्तपत्रे, वृत्तसंस्था तेथील जीवनाचे जे चित्र रेखाटत असतात त्यात फार सुखी जीवन रंगविलेले असते. साखारोव्ह यांनी आपल्या पुस्तकात त्याची दुसरी बाजू दाखविली आहे. रशियाची काळी प्रतिमा आपणास रंगवायची नसून फक्त सत्य स्थितीकडे लक्ष वेधणे एवढाच आपला उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी लिहिले त्यात सत्याचा अंश निश्चित आहे. साखारोव्ह यांना रशियात हे पुस्तक प्रसिद्ध करता आले नाही म्हणून पाश्चात्य राष्ट्रात त्यांनी ते प्रसिद्ध केले. साखारोव्ह परिस्थितीबद्दल एवढे निराश झाले आहेत की कम्युनिस्ट विचारप्रणालीवरचाच त्यांचा विश्वास ढळला आहे; पण केवळ आपल्या राजवटीच्या विरोधकाने केलेली टीका म्हणून साखारोव्ह यांनी मांडलेल्या बाजूकडे रशियातील सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष करणे योग्य होणार नाही. कम्युनिस्ट राजवटीत खऱ्या अर्थाने लोकशाही कशी आणता येईल या दृष्टीने विचार करून पावले टाकण्याची वेळ आता आलेली आहे.

साखारोव्हसारखे शास्त्रज्ञ रशियन राजवटीचे विरोधक बनतात, त्यांना वैफल्य का येते याचे रशियाच्या सत्तारूढ नेत्यांनी आत्मपरीक्षण करून उत्तर शोधले पाहिजे व त्यानुसार उपाययोजना केली पाहिजे. लोकशाही मूल्यांची जपणूक करून समाजवाद आणण्याचा तोच एक मार्ग आहे. □

# मुक्काम पुणे

प्रकाश जोशी

## पुतळा प्रकरण

□ एखाद्या व्यक्तीच्या कार्याचे स्मारक उभारावयाचे झाले की त्याचा पुतळा उभारून हात झटकून मोकळे व्हायचे हा आपला खाक्या. मग उभारलेल्या पुतळ्याचे पुढे काय काय हाल होतात याकडे लक्ष देण्याची जबाबदारी कोणावरच उरत नाही. पुतळा उभारून त्या व्यक्तीच्या कार्यचं स्मरण किंवा आपली त्या व्यक्तीच्या कार्यावरील श्रद्धा खरोखरच प्रकट होते का हा खरा प्रश्न.

पुणे हे कर्तृत्ववान लोकांचे गाव. त्यामुळे रस्तोरस्ती, गल्लोगल्ली आणि चौकाचौकात कुणाचे ना कुणाचे पुतळे हे आपल्याला दिसणारच. पुण्यात जितकी गणेशोत्सवमंडळे आहेत तेवढ्या स्मारकसमित्या आहेत असा अभिप्राय नुकताच एका प्रतिथयशानं व्यक्त केलेला.

हे पुतळा—पुराण आताच आठवायचं कारण एका पुतळ्याचा स्वीकार करण्याच्या प्रश्नावरून पुणे महानगरपालिकेच्या सभेत झालेली खडाजंगी व त्यानंतर चर्चाबंदी. सबर्बन म्युनिसिपालटीचे माजी उपाध्यक्ष आणि गेले २७ वर्षे सभासद असलेले कै. विष्णुपंत भोसले यांचा अर्धपुतळा भोसले स्मारक समितीकडून स्वीकारून तो शिवाजीनगर एस्. टी. स्टँड चौकात बसवावा असा ठराव शिवसेनेच्या सदस्याने मांडला. हा ठराव मांडण्यापूर्वी महापालिकेच्या ज्या कायदेशीर तरतुदी असतात त्या पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत असा हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. हा ठराव पक्षप्रमुख, पब्लिक वर्क्स कमिटी, स्थायी समिती वगैरे मार्फत मांडण्याची पद्धत आहे; परंतु हा ठराव रीतसर मार्गाने आल्याचे सांगून महापौरांनी हरकत फेटाळली.

या वेळी पुतळा कोणाचा उभारावा या प्रश्नावर चर्चा झाली. 'ज्याने देशासाठी' किमान शहरासाठी वादातीत कार्य केले आहे अशा व्यक्तीचे पुतळे उभारले जाणे योग्य; परंतु ज्याने एखाद्या भागासाठी कार्य केले त्यांचे पुतळे पैशाच्या मोजमापाने उभारावेत ही गोष्ट मला पटत नाही. त्यामुळे पुण्यात अनेक घोटाळे होतील असे मत मधुकर निरफराके यांनी मांडताच त्याला आक्षेप घेण्यात आला. पुतळ्यासाठी आमदार ग. दि. माडगूळकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने पैसे उभारल्याचे महापौरांनी स्पष्ट केल्यावर ठराव संमत करण्यात आला.

पालिकेच्या नावसमितीचे अध्यक्ष रामभाऊ वडके यांनी नाव देण्यासंबंधी पालिकेत जो गोंधळ चालतो याबद्दल खेद व्यक्त केला. आपल्या नातेवाइकांचे पुतळे शहरात उभारणे किंवा रस्त्यांना, शाळांना त्यांची नावे देणे हा काँग्रेसच्या काही नगरसेवकांनी चालविलेला प्रकार हा आपल्या पदाचा दुरुपयोग आहे. या प्रकरणी वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी समज दिली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

एकदा पुतळा उभारण्याचे काम पूर्ण झाल्यावर पुढे काय ? पुण्यातील पुतळ्यांच्या परिस्थितीबद्दल लिहिणे म्हणजे एक स्वतंत्र विषयच होईल. एखाद्या व्यक्तीच्या कार्याची आठवण समाजातील नव्या पिढीला सातत्याने रहावी म्हणून फक्त पुतळे उभारणे एवढाच मार्ग आपल्यापुढे शिल्लक उरला आहे काय ? □

## असंतुष्ट प्राध्यापकवर्ग

□ प्राध्यापकांचे सुधारित वेतनश्रेणीसाठी झालेले आंदोलन अद्यापी सर्वांच्या स्मरणात असेलच.

विद्यापीठ—परीक्षेला झालेला अक्षम्य उशीर. त्यानंतर निकाल लागण्यासाठी लागलेला वेळ, कॉलेज सुरू व्हायला उजाडलेला जुलै या साऱ्या गोंधळाचे पालकत्व कोणाकडे आहे ? हा प्रश्न बाजूला ठेवला तरी त्यामुळे त्याचे परिणाम विद्यार्थ्यालाच सर्वांत जास्त भोगावे लागले व लागत आहेत याबाबत शंका नाही.

पृष्ठ ३० वर

# सोलकढी

## □ तर केवढी 'मौज' होईल बरे !

'मौज' प्रकाशनाचे एखादे पुस्तक तुमच्या पाहण्यात आले आहे काय? उगीच विचारायचे काही प्रश्न असतात त्यातलाच हा प्रश्न आहे. तुम्ही उत्तर देऊ नका; मला ते आधीच ठाऊक आहे. 'मौजे'चे कोणतेही पुस्तक कसे पाठपोट, अल्याडपल्याड देखणे असते. वास्तविक पुस्तक असे टपोरदेखणे असायची खास परंपरा आपल्या या खापर-खुंटचा महाराष्ट्रदेशात नाही. आपण मंडळी गबाळग्रंथी आहोत; (आणि त्याचा अभिमान मिरवण्याइतकी धीटही आहोत.) युक्त काय यापेक्षा उपयुक्त काय, याचाच विचार आपण सदैव करत असतो. त्यामुळे हौस ही वस्तू महाराष्ट्रात तशी दुर्मिळच म्हटली पाहिजे. (नाटयक्षेत्रात हौशी मंडळींचे पुंजके आहेत असे मी ऐकून आहे; पण मला तरी त्यांचे चेहरेमोहरे—विशेषतः मोहरे—व्यावसायिकांसारखेच दिसतात.)

असे असताना 'मौज' प्रकाशनाने पुस्तक-प्रकाशनाची आपली हुरळहौस गेली तब्बल पंचवीस वर्षे आपली चालूच ठेवली आहे. या पंचवीस वर्षांत 'मौजे'ने जवळजवळ अडीचशे पुस्तके प्रकाशित केली. ही सगळीच्यासगळी पुस्तके जो वाचक वाचेल त्याला साहित्यिक समज येण्यासाठी आणखी काहीही वाचावे लागणार नाही, असे जे भागवतपुराणात म्हटले आहे ते खरेच असावे. ज्याच्या ज्याच्या म्हणून साहित्यिक समजदारीला आपण मानतो त्याने त्याने ही अडीचशे पुस्तके किमान एकदातरी वाचलेली असतात, असे मी एक पाहून ठेवले आहे. मीसुद्धा आपल्याकडून तसा प्रयत्न एकदा केला होता, हे मला वाचकांना विश्वासात घेऊन मनमोकळेपणाने सांगितलेच पाहिजे; पण मला ते जमले नाही. कथा-कादंबऱ्या-कविता-नाटके-ललितनिबंध कसेबसे वाचले. दमछाक होत, पण वाचले. कारण आपली साहित्यिक समज संपृक्त आणि संपोक्त व्हावी, अशी कांक्षा मला होतीच; परंतु भाषाशास्त्र, साहित्यशास्त्र, संगीतशास्त्र आणि विशेषतः सौंदर्यशास्त्र असल्या शास्त्रीय विषयांवरचे ग्रंथ वाचताना माझ्या बुद्धीला पेटके आले. त्यामुळे या शास्त्रात पारंगत असणारी जी सहस्रावधी मोजकी ('किंवा मौज'की) माणसे आपल्या महाराष्ट्रात अलीकडे पैदा झाली आहेत त्यांच्याबद्दल अनंतरावाला तोबातोबा आदर वाटतो.

'मौजे'ने एकूणच सर्वत्र दबदबा आणि दरारा निर्माण केला आहे. प्रकाशक तेवढे 'मौज'वाले; बाकी सगळे नुसते 'पुस्तक-काढे', असे, 'मौज'वाले नम्रपणाने आणि बाकी सगळे प्रामाणिकपणाने म्हणत असतात. 'मौज' पुस्तकांच्या किंमतीबद्दल वाचक कधीच तक्रार करत नाहीत. उलट इतक्या स्वल्प किंमतीत एवढे सकस साहित्य देणे यांना परवडते तरी कसे, याचा अचंबा करत राहतात. गेली पंचवीस वर्षे 'मौजे'ने स्वस्त पुस्तक योजनाच राबवली आहे, असे त्यांना साभिमान वाटत असते.

'मौजे'च्या पुस्तकांची किंमत खरोखरीच लहान असली तरी दर्जा खरोखरीच महान असतो. मराठीतले सगळे नवे-जुने, तरणे-म्हातारे, पश्चिम महाराष्ट्रातले-अपश्चिम महाराष्ट्रातले श्रेष्ठातिश्रेष्ठ साहित्यिक आपली पुस्तके 'मौजे'ने प्रकाशित केल्याचे स्वप्न पाहत असतात. त्यातले काही तर, त्यांची पुस्तके 'मौजे'ने प्रकाशित केल्यामुळे श्रेष्ठातिश्रेष्ठ होऊन राहिले आहेत. असो.

आत्तापर्यंत 'मौज'-'मौज' असा बिन-चेहऱ्याचा नावोल्लेख करत होतो. आता सांगतो : 'मौजे'च्या पुस्तकांचे सकलसंगोपन आमचे श्री. पु. भागवत करत असतात. श्री. पु. भागवतांचे संथ चालणे; आसनाला फार त्रास होणार नाही अशा बेताबेताने मवाळ बसणे; गणपतीच्या स्वस्तिसूचक हातासारखे उभे राहणे; चहात बुडवलेल्या पावाइतके भिजट बोलणे; एका वेळी ज्याचे डझनभर अर्थ लावता येतील असे कवितोपम गूढरम्य हसणे; बोलता-हसताना कधी उशीला, कधी पेनपेन्सिलीला, कधी आपल्याच मिटलेल्या बोटांना लाडलडिवाळपणे; त्यांचे उजवीकडून डावीकडे जाणारे तिरपे-तरतरीत अक्षर काढणे, नको असलेला शब्द हळुवारपणे खोडणे, नवा शब्द नेटका रेखणे; निर्व्यसनात दंग होणे; दिवसात अवघे चोवीसच तास असताना पंचवीसतीस तास काम करणे आणि अधिक काम करता येत नाही म्हणून खंतावणे; त्यांचे ते 'गाडगिळांच्या कथा' (कॉंटिनेंटल प्रकाशन, १९५८) या गंगाधर गाडगिळांच्या निवडक कथांच्या संग्रहाला तब्बल साडेतेवीस पानांची प्रस्तावना लिहून (आणि नंतर लेखणी कानावर ठेवून) गाडगिळांना आणि स्वतःला अमर करणे (त्या प्रस्तावनेतला, फिकट निळ्या रंगाच्या, पातळ व उंची कागदावर बारीक, कोरीव अक्षरांत लिहिलेल्या आणि गर्द निळचा-जांभळचा रेशमी फितीने बांधलेल्या मर्ढेकरांच्या लेखाचा संदर्भ कोणी विसरू शकेल काय?); त्यांचे ते एकवीस बोटी आणि पोपटाहून पोपटी मराठी साहित्यिकांची मर्जी प्रतिपाळणे--या आणि इतर कित्येक गोष्टींच्या केव्हाच आख्यायिका झाल्या आहेत. ज्यांनी याचि देही याचि डोळां या संपादक-श्रीपूंना पाहिलेले नाही त्यांना तर श्रीपु ही आधुनिक मराठी साहित्यव्यवहारातली


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

अद्भुत दंतकथा वाटते.

मी श्रीपूंना पाहिले आहे. (खरे सांगायचे तर मी त्यांचा सख्खा विद्यार्थी आहे, आहात कुठे) तरी मला त्यांचे अद्भुत वाटतेच. इतकी वर्षे, विनाखंड, मराठी साहित्यिकांचा नको तेवढा निकट सहवास सोसून श्री. पु. भागवतांनी आपले आणि आपल्या कपड्यांचे शुभ्रपण कसे कायम राखले आहे. (जीवन निर्मळ करणारा कोणता साबण ते वापरतात, कुणास ठाऊक), हे अद्भुत नव्हे तर काय? साहित्यिकाचे–तेसुद्धा मराठी साहित्यिकाचे–क्षेम व्हावे यासाठी हा भागवत काय वाटेल ते करील; हे मी तुम्हाला शपथपूर्वक सांगतो. माझ्यादेखत घडलेली गोष्ट ऐका : एके दिवशी मी अघळपघळ असाच श्रीपूंकडे गेलो होतो. तर श्रीपु आपले चिंताक्रांत.

'काय जाहाले?' मी पुशिले.

'वाईट झाले' श्रीपु. वदले.

'काय जाहाले तरी हो काय?' मी पुन्हा पुशिले.

'फार वाईट झाले हो फार वाईट झाले.' श्रीपु पुन्हा वदले...

मग श्रीपूंनी काय फार वाईट झाले ते सांगितले. कोणी एक साहित्यिका होती. तिला रेल्वेलायनीशेजारच्या इमारतीतली जागा नव्याने मिळाली होती. रेल्वेलायनीवरून चक्क गाड्या जायच्या. दुसरे मार्ग त्यांना सोयीचे नसल्यामुळे त्या रेल्वेलायनीवरूनच धावायच्या. नुसत्या नाही; धाडधाड आवाज करत. त्यामुळे त्या साहित्यिकेची मोलाची झोप विस्कळित झाली. विस्कळित झालेली झोप तुमचीआमचीश्रीपूंची नव्हती; एका कलावंताची होती. श्रीपु अगदी व्याकुळ झाले होते. काय करता येणे शक्य आहे; याचा विचार करत होते. (त्यात बहुधा त्यांची स्वतःची झोप यथास्थित विस्कळित झाली असावी.)

सख्ख्या शिष्याला साजेशा गांभीर्याने मी वदलो, 'सर, आपण उगाच काळजी करता. नवीन जागा आहे. गाड्यांच्या आवाजाची सवय नाही त्यांच्या कानांना. म्हणून होते झोपमोड. एकदा सवय झाली की येईल झोप. मग इतकी सवय होईल गाड्यांच्या आवाजाची की कधी गाड्या बंद पडल्या तर आवाज नसल्यामुळे झोप यायची नाही त्यांना.'

'तुम्हाला कल्पना नाही त्यांच्या झोपेची–आणि झोपमोडीचीसुद्धा. म्हणून तुम्ही म्हणालात तसं.' आता श्रीपु सख्ख्या गुरूच्या सात्त्विक आवेशाने उद्गारले,

'या परिस्थितीत, मला वाटतं, जागा बदलणं हाच एक उपाय आहे.' मी बिरबल, नाना फडणीस, तेन्नालिराम यांचा वडील भाऊ असल्याच्या थाटात निर्णय दिला.

'अहो, जागा कशी बदलता येईल या दिवसात?' बिरबल, नाना फडणीस, तेन्नालिराम, अनंतराव यांच्या मुत्सद्दीपणाचा फक्कडफुगा आपल्या प्रश्नाने फोडून श्री. पु भागवतांनी अखेरचा अभिप्राय दिला, 'पण म्हणून उपाय नाही असं मुळीच नाही. एक उपाय आहे : त्यांच्या घराशेजारची रेल्वेलाइनच दूर कुठं तरी हलवली तर सगळाच प्रश्न नाही का मिटणार?'

साहित्यिकाच्या झोपेबद्दल आणि झोपमोडीबद्दल श्री. पु. भागवतांएवढे जागरूक असलेले आणखी पाच-दहा संपादक-प्रकाशक या गबाळग्रंथी महाराष्ट्रात निर्माण झाले तर केवढी 'मौज' होईल बरे!

–अनंतराव


# पॅपिलॉन योजना

**अंदाजे मूल्य**

**पॅपिलॉन**

रवींद्र गुर्जर / रुपये पंचवीस

**हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा**

अशोक परळीकर / रुपये पंधरा

**देवाघरचा पाऊस**

रवींद्र पिंगे / रुपये पंधरा

**संचित (सप्तक?)**

सुमती देवस्थळे / रुपये वीस

**सिनेकलावंतांची व्यक्तिचित्रे (?)**

*योजनेचे स्वरूप*

या योजनेत दरमहा एक पुस्तक याप्रमाणे एकूण पाच पुस्तके प्रकाशित होतील. आज नोंदणीशुल्क दहा रुपये भरून पॅपिलॉन पुस्तकयोजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मात्र यातील प्रत्येक पुस्तक दरमहा फक्त पाच रुपयात मिळू शकेल.

*इतर माहिती*

पूर्वसूचना मिळाल्यावर ग्राहकाने विशिष्ट मुदतीत पाच रुपये भरून आपले पुस्तक कार्यालयातून घेऊन जावे किंवा ५ रुपये + टपाल–पाठवणीखर्च इतक्या रकमेची त्याला व्ही. पी. केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यावी.

पैसे शक्यतो मनीऑर्डरने पाठवावेत. चेक असल्यास वटणावळ २ रुपये अधिक पाठवावी. चेक, ड्राफ्ट, म. ऑर्डर राजहंस प्रकाशन या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

**सुमारे ७५ ते १०० रुपयांची ५ पुस्तके फक्त ३५ रुपयांत.**

# थंड वाऱ्याची झुळूक

अशोक शंकर साळवी

रामभाऊ तलाठ्याची बैठक माणसांनी फुलून गेली होती. एका फाटक्या सतरंजीवर रामभाऊ तलाठी मळकट तक्क्याला टेकून बसले होते. त्यांच्या पुढ्यात लहान उतरत्या आकाराचा डेस्क होता. डोळ्याला चाळिशी लावलेली, तिचा एक दांडा तुटून गेलेला. त्या जागी नवीन बसवणं त्यांच्या शास्त्रात बसत नसल्यामुळे त्या दांड्याची जागा दोऱ्याने घेतली होती. शेलाटी अंगाचा, काळसर वर्णाचा रामभाऊ तल्लख बुद्धीचा होता. त्यांचे तलाठीकार्यालय आपल्या घराच्या पुढच्या बैठकीत त्यांनी थाटलेलं होतं. या दोन खणी छोट्या बैठकीत दिवस उगवल्यापासून ते रात्री दहा-दहा वाजेपर्यंत हरतऱ्हेच्या माणसांची वर्दळ चालू असे. कोणास सात-बाराचा उतारा पाहिजे, तर कोणाला नावनोंदणीचा दाखला पाहिजे, कोणास तारणाचा दाखला पाहिजे तर कोणास जमिनीवर बोजा नसल्याचा दाखला पाहिजे. एक ना दोन, शेकडो प्रकारची माणसं हजार कामांसाठी रामभाऊ तलाठ्याच्या घराचा उंबरा झिजवीत असत. या कामात रामभाऊ इतके गुंतून गेलेले असत की त्यांचं खाणंपिणं, आंघोळ घरात असूनही कधीच वेळेवर होत नसे. आजही तसंच झालं होतं.

रामभाऊ बैठकीत येऊन बसले नाहीत तोच चार-पाच लोक बैठकीत दाखल झाले होते. त्यांनी दिलेलं पान खात, त्यांच्याशी गप्पा मारीत आणि त्याबरोबरच त्यांचे काम उरकत असतानाच दहा वाजत आले तरी त्यांची आंघोळ उरकलेली नव्हती. त्यांच्या पत्नीने तीनदा पाणी तापवून त्यांना आंघोळीसाठी उठावयास सांगितले; पण 'थांब, हा आलोच' असं म्हणत दहा केव्हा वाजले हे त्यांना कळलंही नाही. आता आंघोळ, जेवण एकदमच उरकून घ्यावं आणि नंतर कामाला लागावं असा विचार करून ते आंघोळ करण्यासाठी उठले. शर्ट खुंटीला अडकविला व गळ्यातील जानव्याशी चाळा करत ते बैठकीतील माणसांशी बोलत उभे राहिले. ही माणसेही खट्ट होती. तलाठ्याची आंघोळ, जेवण होईपर्यंत ती तिथंच पानाबरोबर गप्पा चघळत बसणार होती. रामभाऊंनी बायकोला पाणी न्हाणीघरात आणून ठेवावयास तेथूनच मोठ्या आवाजात सांगितले आणि ते घरात जाणार एवढ्यात त्यांना दारात पोस्टमन दिसला. त्याला पाहून रामभाऊ मिष्किलपणे म्हणाले, 'काय रे, काय आलंय् काय?' रामभाऊंना सहज जाता जाता कोणाचीही शाब्दिक चेष्टा करण्याची फार मोठी खोड होती. त्यांचा हा गमत्या स्वभाव सर्वांना परिचित होता. पोस्टमननेही हसतच त्यांचा अहेर त्यांना परत केला 'भाऊसाब, आमा गरिबास्नी काय येनार हाय एवढं? तुमासारख्या मोठ्यांनाच आलंय्; हं, हे घ्या!' असं म्हणत त्याने एक लखोटा रामभाऊंच्या हातात दिला. रामभाऊ आंघोळीला जायचे थांबले व लखोटा फोडून वाचू लागले. लखोटा वाचून झाल्यावर त्यांचा चेहरा पार बदलला व त्रासिक स्वरात ते पोस्टमनवर खेकसले, 'लेका शिव्या, आज तारीख कोणती रे?'

'आता मला गरिबाला काय ठावं? तुम्हीच सांगा की!'

'लेका, तारीख माहीत असण्यात गरिबीचा काय संबंध? तू सरकारची नोकरी करतोस का हजामती करतो?'

'दोनीवी.' शिव्याच्या उत्तरावर सगळी मंडळी खदखदून हसली. शिवा न्हावी आपला पिढीजात धंदा सांभाळत सरकारची ही सेवा फावल्या वेळात करीत होता.

'हे पोस्टखातं म्हणजे अजब आहे. माणूस मेल्यावं पत्र प्रथम येतं आणि आजारी असल्याचं नंतर मिळतं. शिव्या, दहा तारखेचं पत्र आज वीस तारखेला मिळालं. आता काय म्हणावं तुला?' रामभाऊ पुन्हा तक्क्याला टेकले.

'काय इशेश हाय का पत्रात?' एकजणानं विचारणा केली.

'विशेष म्हणजे? फार महत्त्वाचं आहे हे पत्र! बरं झालं निदान आज दहाला तरी मिळालं. आज तालुक्याला कलेक्टरसाहेबांची व्हिजिट आहे आणि तहसीलदारसाहेबांनी सगळ्या तलाठ्यांना बोलावलं आहे. चार वाजेपर्यंत कसल्याही परिस्थितीत मला तालुक्याला पोहोचलंच पाहिजे!'

'भाऊसाब, मी म्हनून तुम्हाला हे पत्र आज तरी मिळालं. आपलं गाव काय धड रस्त्यावर पडलं? पोस्टखात्याला कशापायी नावं ठिवता? रोड गाठायचा म्हनलं तर सहा मैलांची पायपीट करावी लागतीय!'

'होय बाबा, लई उपकार केलं बघ तू पत्र देऊन.' आणि विजेचा झटका बसल्यासारखे रामभाऊ ताडकन् उठले. 'बराय् मंडळी, या आता तुम्ही. मी लागतो उद्योगाला.' असं म्हणून ते प्रथम आंघोळीला गेले.

रामभाऊ ज्या गावात तलाठी होते तो गाव तालुक्यापासून पंचवीस-सव्वीस मैल अंतरावर होता. गावकऱ्यांना कोणत्याही हमरस्त्यावर जायचे म्हटले तरी सहा मैल चालावे लागत होते, इतके हे गाव आडवळणी होते आणि हमरस्त्यावर गेल्यावर मात्र कसलीही चिंता नव्हती. कारण मिळेल त्या गाडीने एक तासाभरात तालुक्याला पोहचता येत असे.

रामभाऊंनी भरभर आंघोळ उरकली, जेवण आटोपलं व बैठकीत आले. पत्रात लिहिल्याप्रमाणे हवे ते कागद-पत्र, वह्या एका लांब पिशवीत घेतले, खोगीर चढवल्यासारखा कोट अंगावर चढवला अन् पायात वहाणा

सरकवू लागले. एवढं होईपर्यंत साडेअकरा वाजून गेले होते. त्यांनी मनाशी गणित केले. सहा मैलांची चाल म्हणजे भरभर गेलं तरी दोन तास लागणारच, म्हणजे दीडपर्यंत रस्त्यावर पोहोचू आणि दोन वाजेपर्यंत गाडी मिळाली की तीन वाजता तालुक्याला आपण पोहोचतो. हे गणित जुळल्याबरोबर त्यांना हायसं वाटलं. घरात त्यांनी डोकावून पाहिलं, तर त्यांच्या पत्नी दारातच उभ्या होत्या. पायात सरकविलेल्या वहाणा काढून ते परत घरात गेले व उद्या दुपारपर्यंत येतो असं सांगून ते निघाले; पण तेवढचात आतून कातरलेला आवाज आला,

'ऐकलं का ?'

'अजून काय तुझं ?'

'तेवढचा गोष्टीला जपावं, माझी शपथ आहे.'

'बरं, बरं, तू बिनघोर रहा !'

रामभाऊ तलाठी या गावात येऊन दहा-बारा वर्षं होत आली. त्यांनी अनेक लोकांची भली-बुरी कामं केली. या गावात आल्यावर पैसाहि बक्कळ मिळवला. पैसा मिळूनहि त्यांना आपली राहणी अति साधी ठेवणं भाग पडलं. खेडचातून छानछोकीत राहणं म्हणजे चार लोकांच्या डोळचांवर येतं म्हणून हौस, इच्छा असूनहि त्यांनी स्वतःसाठी अथवा बायकोसाठी कपडचा-लत्त्यांची, दाग-दागिन्यांची चैन केली नाही. ते स्वतः धोरणी होते. मिळेल तो पैसा आपल्या स्वतःच्या गावी जमिनी घेऊन त्यात गुंतविला. नोकरी लागली त्या अगोदरच्या दिवसपर्यंत ज्याला उद्याची भ्रांत होती असा हा फाटका माणूस आठ-दहा वर्षांत बरीच माया जमवून बसला होता; पण हे उघड दाखवता येत नव्हतं, हेच अवघड जागचं दुखणं होतं. त्यांनी कधी कोणास दुखविलं नाही. ज्यांनी पैसे दिले त्यांची कामे केली, ज्यांनी दिले नाहीत त्यांचीही हसतमुखाने केली; पण तलाठचाचं काम पडलं, हाती सत्ता राहिली, पैसा मिळतच गेला. रामभाऊंनी तो वारेमाप न उधळता त्याचा योग्य संचय केला. लग्न होऊन पंधरा वर्षं झाली, तरी मूल नाही. अनेकांनी दुसऱ्या लग्नाचा सल्ला दिला तरी त्यांनी तो मानला नाही. असा हा माणूस कोणत्या तरी एका क्षणी घसरला आणि नको त्या व्यसनात गुरफटला. रोज सकाळी चहाचा कप पिण्याऐवजी दारूचा कप घेऊ लागला. व्यसन वाढतच राहिलं. आणि आज त्यांची पत्नी याच गोष्टीला जपण्याची कातरत्या स्वरात विनंती करत होती. 'तू बिनघोर रहा !' असं म्हटल्यानं तिच्या मागचा घोर संपणार नव्हता.

रामभाऊ तलाठी लांब लांब पावले फेकत अंतर कमी करू लागले. ऊन तापत होतं तसं रामभाऊंचं डोकही तापू लागलं. धाप लागली. कुठंहि माणूस दिसत नव्हता की वस्ती दिसत नव्हती. आज तालुक्याला कलेक्टरनं कसलं काम काढलं असावं, कोणकोणते कागद-पत्र तपासतील या विचारांच्या तंद्रीत ते चालत होते तेव्हा दोन वाजले होते. आल्याआल्या त्यांनी प्रथम एका हॉटेलात जाऊन तोंडावर पाण्याचा शिडकावा केला अन् धोतराच्या सोग्याने तोंड पुसले.पाणी पिल्यावर त्यांना बरं वाटलं.हॉटेलवाल्या पोऱ्यानं चहा पाहिजे का म्हटल्यावर त्यांना हसू आलं. घशाला कोरड पडली होती अन् आता या वेळी रामभाऊंना एक कप पाहिजे होता; पण तो चहाचा नको होता हे त्या पोऱ्याला कसे समजणार ? या वेळी मिळेल की नाही शंका होती. त्यांनी आसपास नजर टाकली. आठ-दहा लोक एस. टी. ची वाट पाहत बसले होते. सिमेंटकाँक्रीटचा मुळातच शुभ्र रस्ता उन्हात आणखीन शुभ्र भासत होता, तसाच तापलाही होता.

दुरून मोटारचा आवाज ऐकू आला तसे रामभाऊ जागचे हलले. पिशवी संभाळत एस. टी. थांबते त्या ठिकाणी आले. एस. टी. दिसू लागल्यावर त्यांनी हात वर केला; पण गाडी आली तशी न थांबताच निघून गेली. गाडी गेल्या दिशेकडे रामभाऊ त्रासिक नजरेने पाहू लागले. आता दुसरी एस. टी. येईपर्यंत वाट बघत बसण्याशिवाय मार्ग नव्हता. शेजारच्या एका गृहस्थाला त्यांनी विचारले,

'आता परत केव्हा आहे गाडी ?'

'गाडचा मोप हायत्या वो, पण त्याचा उपेग काय ? सकाळपास्नं मी इथं उभा हाय, पण एक एस. टी. उभा राह्यचं नाव घीना!'

'का ?'

'पंढरपुरची वारी माघारी फिरली नवं ? द्वादशी की आज !' आणि हे ऐकून रामभाऊंचे हातपायच गळाले. कालची पंढरपूरची वारी त्यांच्या लक्षातच आली नाही. ट्रकनं जावं तर त्यांचं मन त्याला तयार होईना. त्यांच्यापुढं मोठा पेच उभा राहिला आणि ते तिथंच वाळूवर सावलीत टेकले. किती वेळ बसले असतील कुणास ठाऊक, पण त्यांची तंद्री कुणी तरी रामराम घातला त्या वेळीच भंगली.

'आ, रामराम, भाऊसाव.'

'रामराम!' रामभाऊंनी पाहिलं याच स्टँडवरील एक ओळखीचा इसम त्यांच्याकडे येऊ लागला होता.

'कुणीकडं दौरा काढला उनाचा ?'

'आणीक दुसरीकडं कुठं, तालुक्यालाच; पण ह्या वारीनं घोटाळा केला की, एस. टी. थांबायला तैयारच नाही!'

'आज काय गाडी थांबतीय्. पंढरपूरनं फुल्ल भरून चालत्यात्या.'

'काय खरं नव्हं, जायला तरी पाहिजेल.'

'चला, च्या तरी घेऊ.'

'चहा नको. कडक पाणी मिळल का ?'

'वा ! तुम्ही विचारावं न् आम्ही नाही म्हणावं ! चला, त्याचीबी येवस्था करतो. फर्स्टक्लास पाणी हाय्, ताजं.' आणि दोघंही निघाले.

एका जवळच्याच झोपडीत रामभाऊ तलाठी मनसोक्त पाणी पिले. त्यांचा जीव थंड झाला. इतक्या वेळ भणभणणारं डोकं शांत झालं. नको नको म्हणत असता आणखी तीन-चार कप पोटात गेले. तीन वाजून गेले आणि रामभाऊ हवालदिल झाले. आता तालुक्याला जावं की न जावं असा पेच त्यांच्यापुढे पडला. तालुक्याला जाण्यासाठी गाडी मिळणार नाही, परत जावं ह्याचाच विचार त्यांनी पक्का केला. ते गावाकडील रस्ता पकडणार होते. त्यांनी सिमेंट रस्त्यावर दूरवर पाहिलं. दोन छोटचा कार एकामागून एक वेगाने येत असलेल्या दिसल्या. त्या गाडचा पाहून त्यांच्या मनात विचारांचं काहूर माजलं. आपल्यालाही या वेळी अशीच गाडी असती तर ? आपण केव्हाच पोहोचलो असतो, हेही भाग्यात असावं लागतं ! जवळ मुबलक पैसा असूनही त्याचा काडीचाही उपयोग नाही, चैन नाही. उन्हातान्हात वणवण फिरावं लागतं. काय करायचंय् असल्या पैशाला ? रामभाऊ आता मनोराज्य करू लागले, माडचांवर माडचा बांधू लागले. आपण एक झकास ॲम्बेसेडर घेतली आहे आणि मागे गादीला ऐटीत टेकून बसलो आहोत. भर उन्हात गाडी काँक्रीट रस्त्या-

वरून धावत आहे. आणि...आणि खिडकीतून येणारी थंड वाऱ्याची झुळूक आपल्याला हसवते आहे. एक गाडी त्यांच्याजवळ आली आणि नकळत रामभाऊंनी हात वर केला; पण काहीच उपयोग झाला नाही. गाडी पुढे निघून गेली. रामभाऊंनी हात जो वर केला होता तो खाली न घेता ते गेल्या गाडीकडे एकटक पाहत राहिले. दुसरी गाडीही त्यांच्या पुढून झर्‌कन निघून गेली. ही गाडी तरी कसली थांबणार या विचारात असतानाच त्यांना एक सुखद धक्का बसला. गाडीला कर्‌कर्‌ ब्रेक्स लागले आणि पंचवीस-तीस फुटांवर ती गाडी थांबलेली त्यांनी पाहिली. रामभाऊंना विचार करावयास संधीच मिळाली नाही. एका हातात पिशवी व एका हाताने धोतर सांभाळीत ते गाडीकडे धावत गेले. नाही म्हटलं तरी परिणाम झाला होता. धुंदी चढली होती. इकडे-तिकडे झोक जात होते. या गाडीनं घेतलं तर जायचं असा निश्चय केला आणि नाही म्हणाले तर राहिलं, गावाकडे परत फिरायचं.

खिडकीतून त्यांनी आत डोकावून पाहिलं. एक गोरा, गुबगुबीत गालांचा साहेब मागील सीटवर आराम टेकून बसला आहे. दुसरं कोणीही नव्हतं. ड्रायव्हर पांढऱ्या शुभ्र गण-वेषात होता. रामभाऊंनी खिडकीत डोकावलं त्याच वेळी एक आंबूस भपकारा त्यांना जाणवला. तरीही शांत आवाजात साहेबांनी रामभाऊला विचारलं,

'कुठं जायचं आहे ?'

'मोहोळला.'

'कोण तुम्ही ?'

'मी तलाठी. मोहोळला आज कलेक्टर-साहेबांची व्हिजिट आहे' आणि याच वेळी ड्रायव्हरने मागे वळून पाहिले. साहेब क्षणभर गप्प राहिले आणि त्यांनी विचारले,

'एस्. टी. मिळाली नाही ?'

'नाही साहेब, वारीमुळं एस्. टी. थांबतच नाही.' साहेबांनी मनाशी कसला तरी निश्चय केला व म्हणाले,

'ठीक आहे. इकडून या !' रामभाऊ दुसऱ्या दाराने आत येऊन बसले. ड्रायव्हरने दार पक्के लावून घेतले आणि गाडी वेगाने अंतर कापू लागली. झाडामागून झाडे पळू लागली. खिडकीतून वारा आत आला, तशी रामभाऊ मान मागे टेकून आरामात बसले. जसजसा वारा लागू लागला तसतसा रामभाऊंचा स्वतःवरचा ताबा सुटू लागला. धुंदी आणखीन्‌ चढली. इतक्या वेळ ताब्यात असणारी जीभ वळवळू लागली. ते मनाशीच खुदकन्‌ हसत व परत लोडाला मागे टेकून डोळे मिटून घेत. डोळे मिटलेल्या अवस्थेतच त्यांनी प्रश्न फेकला,

'साहेब, काय किंमत हाय्‌ ह्या गाडीची ?' हा प्रश्न ऐकून साहेब गालात स्वतःशीच हसले.

'वीस हजार. का, घ्यायचा विचार आहे काय ?' रामभाऊ मोठ्यांदा बराच वेळ हसत राहिले.

'साहेब, आम्ही गरीब माणसं, वीस हजाराची गाडी कशी घेणार ? सहज आपलं विचारलं.' आता साहेब तलाठ्याला बोलता करू लागले.

'का बरं ? तलाठ्याला तर चिक्कार पैसा मिळतो.'

'मिळतो की, नाही कोण म्हणतो ? पण त्याचा फायदा काय ? गाडी घेऊन जावं कुठं ?'

'हां, तेही खरंच आहे; पण माझ्या माहितीतला एक तलाठी आहे. त्यानं आपल्या मुलाला शिकवलं, अन्‌ त्याला गाडी घेऊन दिली.' साहेब रामभाऊला डिवचू लागले.

'घेतली असल, घेतली असल' आणि रामभाऊ गप्प राहिले.

'तुम्ही काही माया गोळा केलेली दिसत नाही.' यावर रामभाऊंनी साहेबाकडे पाहिलं, सांगावं की न सांगावं या विचारात ते पडले.

'आता बघा, तलाठ्याचं काम पडलं हे, थोडी-बहुत प्राप्ती राहणारच की.'

'नाही म्हटलं गाडीची किंमत विचारली तुम्ही. माणूस उगी चौकशी कशी करल ?'

'साहेब, तुम्ही म्हणता ते खरं आहे, मी एकच काय असल्या चार गाड्या घेईन एवढी ऐपत हाय आपली !' रामभाऊंनी दोन्ही पायांना ताणाव दिला व माने मागे दोन्ही हात अडकवून ऐटीत बसले.

'असं का, वा ! वा ! म्हणजे बरीच मिळकत आहे म्हणा की तुमची. नाही म्हणजे तलाठ्याला इतका अमाप पैसा मिळतो कसा हो ? लोक देतात तरी कसे ?' साहेबांनी कुतूहलपूर्वक विचारले.

'त्याचं काय आहे साहेब, जमिनीची खरेदी करणारा बी पैसा देतो अन्‌ विकणाराही देतो. कुळ बी खिसा भरतं अन्‌ मालक तर काय पाहिजेल ते द्यायला राजी असतो. अवो, एक मार्ग हाय का पैसा मिळण्याचा, शेकडो !'

'ड्रायव्हर, गाडी चालीससे जाने दो.' तालुक्याचं गाव पाच-सहा मैलांवर राहिलं तसं साहेबांनी ड्रायव्हरला फर्मावलं. ड्रायव्हरने गाडी लो स्पीडवर आणली. साहेब रामभाऊंना एक एक प्रश्न विचारू लागले आणि रामभाऊंनी हळूहळू सर्व सत्य माहिती सांगावयास सुरुवात केली. आपण कोणत्या व्यवहारात किती पैसे खाल्ले आणि काही वेळा दोन्ही पार्टीकडून पैसे खाऊन त्यांना कसं बनवलं याचे मजेदार किस्से सांगितले. त्यांचा विश्वास बसावा म्हणून पुराव्यासहित उदाहरणे सांगितली. रामभाऊंना भान राहिलं नाही. साहेब विचारतील त्या प्रश्नांची दर्पोक्तीसह उत्तरे ते देत राहिले. तालुक्याचं ठिकाण आलं. गाडी स्टँडजवळच्या चौकात बाजूला थांबली. रामभाऊ खाली उतरले. त्यांनी साहेबांचे अनेकवार आभार मानले व गाडी रेस्टहाउसच्या दिशेने निघाली तशी रामभाऊ गडबडीनं म्हणाले,

'साहेब, हा रस्ता रेस्टहाउसकडे जातो.' गाडी थांबली.

'मला तिकडंच जायचं आहे.'

'आँ, ते कशाला ?'

'मीटिंगला !' रामभाऊंचं काळीज धस्स्‌ झालं. त्यांनी भीत भीत विचारलं,

'साहेब, एक विचारायचं राह्यलं. आपण कोण ?'

'मी...कलेक्टर !'

'आँ, अन्‌...' रामभाऊंना दरदरून घाम सुटला. त्यांच्या डोळ्यांपुढे काजवे चमकले. इतक्या वेळची नशा खाडकन्‌ उतरली. त्यांनी रस्त्यावरच लोटांगण घातलं आणि ते मोठ्याने किंचाळले,...

'साऽऽऽहेब, मला माफ करा !' रामभाऊंनी उठून पाहिलं त्या वेळी गाडी रेस्ट-हाउसच्या दाराजवळ थांबली होती. रामभाऊंना मीटिंगला जाण्याचं धैर्य उरलं नाही. ते परत फिरले.

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात रामभाऊ तलाठी सस्पेंड झाल्याची बातमी ठळक अक्षरात प्रसिद्ध झाली.

रामभाऊ तलाठ्याला थंड वाऱ्याची झुळूक फारच महागात पडली. □ □

## मूळ लेखक : पियर्स पॉल रीड
## अनुवाद : रवींद्र गुर्जर
## लेखांक : बारा

: १ :

सॅंटियोगोमधील जनरल हॉस्पिटलमध्ये दुसऱ्या गटातील जेव्हियर मिथॉल याने प्रथम प्रवेश केला. हेलिकॉप्टर त्या हॉस्पिटलच्या गच्चीवरच उतरलं. मुलांना फक्त एक मजला खाली उतरून जायचं होतं. तिथे लोकांची तुफान गर्दी जमली होती. बचावलेल्या तरुण मुलांच्या दर्शनानं, त्यांच्याशी काहीही संबंध नसलेल्या लोकांनाही अतिशय आनंद झाल्याचं त्यांच्या चेहऱ्यांवरून दिसत होतं.

नंतर जेव्हियरनं स्नान करण्याची इच्छा दर्शवली. एका नर्सनं त्याला नजीकच्या बाथरूममधे खुर्चीवरून ढकलत नेलं. ती म्हणाली, की, ' शॉवर घेताना मलाही इथे थांबावं लागेल. कारण तुमच्यावर काळजीपूर्वक देखरेख करण्याची सूचना मला मिळालेली आहे. ' जेव्हियर म्हणाला, ' ठीक. ' कितीही नर्सेसचा तांडा समोर उभा राहिला तरी त्याला आता फिकीर नव्हती. अजूनही अंगावर पहिलेच गलिच्छ कपडे होते. ते काढून टाकून. त्यानं गरम पाण्याचा शॉवर सुरू केला. मनसोक्त स्नान उरकल्यावर नर्सनं पुरवलेला पांढरा स्वच्छ पोशाख त्यानं घातला. आपण कोणी तरी वेगळेच आहोत असं त्याला वाटू लागलं. पुन्हा खुर्चीवर बसून तो वॉर्डमधे आला. तेव्हा तिथे बाकीचे सहकारी जुन्याच कपड्यात असल्याचं त्याला दिसलं.

' ओह, प्लीज, ' तो म्हणाला, ' या घाणेरड्या लोकांना इथून तावडतोब हलवा ! '

सर्वांचं स्नान उरकल्यावर डॉक्टरांनी त्यांची सर्व प्रकारे तपासणी केली. एक्सरे आणि रक्ताच्या तपासणीसह. हार्ले आणि मिथॉल या दोघांखेरीज बाकीच्यांना ' शेरेटन सॅन क्रिस्टोबल हॉटेल ' मधे दुपारी जायला परवानगी देण्यात आली. सॅन फर्नांदोहून नुकत्याच आलेल्या इन्शार्ते आणि मॅंगिनोच्या वॉर्डमध्ये हार्ले–मिथॉल यांना ठेवण्यात आलं. हार्लेची स्थिती सर्वांत गंभीर होती. रक्तातील पोटॅशियमच्या अभावामुळे त्याच्या हृदयावर परिणाम झालेला होता.

बाकीची मुलं अत्यंत खुशीत होती. झेर्बिनोनं वडलांबरोबर बूट-खरेदीच्या निमित्तानं पळ काढला. सर्वांना खाद्यपदार्थ पुरवण्यात आले. सुरुवातीला चहा, बिस्किटं आणि चीज. चीज आणखी हवं म्हणून लगेच मुलांनी विनंती केली. पाठोपाठ जेवणाचीच व्यवस्था



दोन हेलिकॉप्टर्स एकदाची फेअरचाइल्डजवळ पोचली. चार चार मुलांना घेऊन लगेच लॉस मेटनीजकडे निघाली. हिरव्यागार जमिनीला पाय लागताच मुलं आनंदानं बेभान झाली. नंतर बचावलेल्या सोळा जणांची नावं रेडिओवरून प्रसृत करण्यात आली. पालकांना तो अनपेक्षित धक्काच होता. ज्यांची नावं त्या यादीत नव्हती अशा एकोणतीस घरात केवढा हलकल्लोळ माजला असेल ! मुलांना भीती फक्त एकाच प्रश्नाची वाटत होती : ' इतके दिवस तिथे खाल्लं काय ?' हॉस्पिटलमधे काही मुलांची आणि त्यांच्या पालकांची भेट झाली, तो सोहळा अवर्णनीय असाच होता. राहिलेली आठ अजून अँडीजवरच होती. दुसऱ्या दिवशी त्यांनाही सोडवण्यात आलं. दहा आठवडे सर्वजण जे एकच स्वप्न पाहात होते, ते आज साकार झालं. त्यांचा एकांतवास संपला. साऱ्या जगातून आलेले बातमीदार त्यांची मुलाखत घेण्यासाठी अधीर झाले होते. ख्रिसमसनिमित्त जंगी मेजवानी आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर आपल्या देशाला जाण्यासाठी मुलं आणि पालक मोकळे होणार होते. . . . . . . . . . . . . . .

झाली. भुकेलेले ' रुग्ण ' त्यावर तुटून पडले. नंतर विश्रांती.

संध्याकाळचे सात वाजले. शेरेटन हॉटेलमधे सर्वांना नेण्यात आलं. ख्रिसमस केकची ते आतुरतेनं वाट पाहत होते. अकरा वाजता त्यांना क्रीम-चॉकलेट मिळालं.

जेव्हियर हॉस्पिटलमधेच राहिला होता. बारा वाजण्याच्या सुमारास—जेव्हा तिकडे समारंभ साजरा होत होता—त्याच्या पोटात ढवळाढवळ सुरू झाली. त्यानं बेल वाजवून नर्सला बोलावलं आणि औषध मागितलं. तिनं ते दिलं. त्याला पुन्हा झोप लागली; पण फारच थोडा वेळ. जुलाबाच्या भावनेमुळे त्याला उठावं लागलं. खाण्यावर ताबा न ठेवल्याची किंमत त्याला मोजावी लागत होती. ◻

## : २ :

२३ डिसेंबरला युरुग्वेहून पालक मोठ्या संख्येने चिलीत दाखल झाले. वाचलेल्या आणि न वाचलेल्या मुलांचे सुद्धा. क्रिलॉन हॉटेलमधे सर्वांनी मुक्काम ठोकला.

सोळा मुलांनी कोणत्या ' अन्ना 'च्या आधारानं टिकाव धरला हे त्यांना कळून चुकलं होतं. दगावलेल्या मुलांच्या आई-वडलांना त्यामुळे किती यातना झाल्या असतील याची कल्पनाच केलेली बरी; पण त्यांचं अंतःकरण इतकं थोर की आपलं दुःख प्रकट करून त्यांनी सुदैवी पालकांना एका शब्दानं दुखवलं नाही. उलट पंचेचाळीस उतारू असल्यामुळे सोळा मुलं तरी बचावली असा त्यांनी विचार केला.

अखेर बारा मुलांची आणि त्यांच्या पालकांची गाठ पडली. पँको आणि कॅनेसाच्या भावी बायकाही त्यात होत्या. हॉटेलची इमारत अत्याधुनिक होती. शहरातील ते सर्वांत महाग आणि आरामशीर हॉटेल. पोहोण्याचा तलावही होता. सर्व मुलांना तिथे मुक्त हालचाली करण्याची मुभा होती. खाण्यापिण्याची चंगळ तर होतीच. सॅबेला आणि कॅनेसा मात्र स्थितप्रज्ञासारखे वागत होते. शेरेटन हॉटेल काय किंवा गुराख्याची झोपडी काय, दोन्ही ठिकाणी सारखाच आनंदी-आनंद होता. मानसिक कष्ट आणि उपासमारीमुळे सर्वांचा कायापालट झाला होता. प्रत्येकाची वागणूक पार बदलली होती. केवढ्या मोठ्या संकटातून ते आश्चर्यकारकरीत्या जिवंत परतले होते. स्वतःची काळजी वाहायला ते आता पूर्णपणे समर्थ होते.

सोळा मुलं वाचल्याची वार्ता सुरुवातीला ऐकल्यावर पालकांचा सुद्धा त्यावर विश्वास बसला नव्हता. अनपेक्षित आनंदाचा धक्काही एकदम सहन होत नाही, तशीच त्यांची अवस्था झाली. मुलं प्रत्यक्ष दिसेपर्यंत त्यांना खूप हुरहूर लागली होती. त्यात भर म्हणजे मांस-भक्षणाकडे जग कोणत्या दृष्टीनं पाहील ही भीती—

पण आता ते बरेच शांत झाले होते. वार्ताहरांनी नाना प्रश्न विचारून भंडावून सोडलं होतं. शेकडो फोटो काढण्यात आले. २३ तारखेच्या रात्री कोणालाच स्वस्थ झोप लागली नाही.

काही पालकांनी मुलांसह लगेच मॉंटेव्हिडिओला परतायचं ठरवलं. उदा. फ्रँकॉइस आणि फर्नांडिझ. त्याप्रमाणे के. एल्. एम्. विमानातून ते रवानाही झाले. मृत डॅनियल शॉचे वडील आणि भाऊ हे देखील त्याच विमानात होते.

चिलीच्या नागरिकांनी आपल्या गाड्यांमधून मुलांना शहरात हिंडवलं. नवीन कपडे खरेदी केल्यानंतर व्यापाऱ्यांनी त्याचे पैसे घेण्याचं नाकारलं. लोक त्यांना चटकन् ओळखत. बर्फाचा पायावरील परिणाम अद्याप गेला नव्हता. मुलांना नैसर्गिकपणे चालता येत नव्हतं. ओळख पटल्यावर सर्वत्र त्यांचं उत्साहानं स्वागत होई. स्वतःच्या मुलाप्रमाणे तिथले उदार लोक त्यांना स्नेहपूर्ण वागणूक देत होते. त्यांना अनेक भेटी मिळाल्या, ज्या नाकारता येणं सर्वस्वी अशक्य होतं. ख्रिसमसचा चमत्कार म्हणून त्यांची सुटका ओळखली जाऊ लागली. शहरातल्या एका बाईचा मुलगा आजारी होता, म्हणून ती जनरल हॉस्पिटलमधे आली. कशासाठी तर बचावलेल्या एका मुलास जरी छातीशी धरलं तरी तिचा मुलगा लगेच बरा होईल अशी खात्री तिला वाटत होती.

त्याच रात्री सीझर चारलोन यांनी मेजवानीची चोख व्यवस्था केली. या दिवसाची सर्वजण उतावीळपणे वाट पाहत होते. चारच दिवसांपूर्वी त्यांची आशा संपुष्टात आली होती. मुलांना आपण आपल्या घरी परत जाऊ ही कल्पनासुद्धा अशक्य कोटीतील वाट-

लागली होती; आणि आता सगळे एकत्र जमले होते. मॅडेलॉन रोड्रिगेझ, रोझिना स्ट्राउच, मेका कॅनेसा आणि सारा स्ट्राउच यांची ज्वलंत श्रद्धा; पेझ, झेबिनो, हार्ले आणि कॅनेसा यांनी मुलांच्या शोधासाठी घेतलेले अविश्रांत परिश्रम या सगळ्याला सुंदर फळ प्राप्त झालं होतं. त्या रात्री फादर आणि चर्चमधील अन्य लोकांनाही निमंत्रण गेलं. त्यांना मांस खाण्याची वार्ता समजल्यावर, ती सहन झाली नाही; पण प्राप्त परिस्थितीत दुसरा इलाजच नव्हता, त्यामुळे मुलांना क्षमा केलीच पाहिजे हेही त्यांना पटत होते.

–आणि दुसऱ्या दिवशी कॅथॉलिक युनिव्हर्सिटीमधे झालेल्या प्रवचनाचे वेळी फादर रोड्रिगेझनं उदार अंतःकरणानं क्षमा जाहीरही केली. मुलांचा जाहीर स्वीकार झाला त्यांच्या कृत्याचा उच्चार न करता.

पण ती वादळापूर्वीची शांतता ठरली. वृत्तपत्रांमधून बराच गाजावाजा झाला. जिवंत राहण्यामागील सत्य सर्वांना समजलं. पर्वतामधे चीज आणि वनस्पती खाऊन दिवस काढले असं मुलांनी सांगितलं होतं ते साफ खोटं असण्याचं वृत्त प्रसिद्ध झालं. जगातील वृत्तपत्रांनी ती बातमी उचलली. पुन्हा मुलांभोवती गर्दी. आता नाकारणंही अशक्य होतं. अर्धवट खाल्लेल्या माणसाचा फोटोही मग पहिल्या पानावर छापण्यात आला.

मुलांनी असं ठरवून टाकलं की मॉंटेव्हिडिओला गेल्यावर सरळ एक प्रेसकॉन्फरन्स भरवायची. उलट-सुलट वेडचा-वाकडचा बातम्या छापून येण्यापेक्षा सत्य काय ते प्रसिद्ध होणं केव्हाही चांगलं. वृत्तपत्रांना काय सनसनाटी बातम्या हव्याच असतात; पण विमान कोसळल्यावर मुलांची झालेली दुर्दशासुद्धा लोकांनी ध्यानात घ्यायला हवी होती. काही वृत्तपत्रांनी एवढ्यापर्यंत मजल मारली की ‘ बर्फाचा कडा वगैरे काही कोसळला नव्हता तर सशक्त लोकांनी भूक भागविण्यासाठी काही मित्रांना ठार केलं !’

अजूनही मुलांचं मन ताळ्यावर आलेलं नव्हतं. अशा बातम्यांमुळे त्यांच्यावर आणखी विपरीत परिणाम होण्याची शक्यता होती. निरनिराळे फोटो छापून अँडीज-इतिहास भडकपणे प्रसिद्ध होत होता. फेअरचाइल्डचं दृश्य, प्रेतांचे विविध अवयव पसरलेले. इ. इ. जाड टाइपात ‘ ईश्वर त्यांना क्षमा करो !’ असा मथळा छापला होता. ज्या पालकांनी हे सगळं वाचलं, ते ढसढसा रडलेच !

शेरेटन हॉटेलचं वातावरण पार बिघडून गेलं. आपल्या देशाला परतण्यासाठी मुलं अधीर झाली होती. विमानातून जायची त्यांची तयारी नव्हती. बस किंवा रेल्वेनं जावं असं त्यांना वाटत होतं. २८ तारखेला बोइंग ७२७ सोडायची चारलोन यांनी व्यवस्था केली होती. अल्गोर्टा आणि पेरॅडो या दोघांनी नातलगांसह हॉटेल आधीच सोडलं होतं. मिनिटामिनिटाला घेतले जाणारे फोटो आता त्यांना असह्य झाले होते. वार्ताहरांच्या प्रश्नांचा वीट आला होता. पेरॅडोला आई आणि वहिणीच्या मृत्यूचं दुःखही तीव्र झालं होतं. ¤

## : ३ :

रेडिओ, टेलिव्हिजन आणि वृत्तपत्रांनी सुटकेच्या घटनेचा चावून चोथा केला. त्यानंतर नरमांसभक्षणाची वार्ता प्रसृत झाल्यावर पुन्हा त्यांना नवा विषय मिळाला. त्यानं उग्र रूप धारण केलं. युरुग्वेखेरीज साऱ्या जगभर ते जाहीर झालं हे विशेष.

युरुग्वेमधल्या वृत्तपत्रांनी मात्र मौन राखलं. मुलांनी समक्ष सांगितल्याशिवाय एकाही अफवेला स्थान द्यायचं नाही असा शहाणपणाचा निर्णय त्यांनी घेतला होता. त्यांना उत्सुकता नव्हती अशातला भाग नाही.

डॅनियल फर्नांडेझ आधीच मॉंटेव्हिडिओला परतला होता. विमानतळावरून त्याच्या आईवडिलांनी सरळ त्याला घरी नेलं. कोणालाही त्या दिवशी त्याची भेट घेऊ दिली नाही; पण दुसऱ्या दिवशी मित्रमंडळ आणि बातमीदारांनी त्यांचं घर भरून गेलं. दिवस ख्रिसमसचा. घर बंद ठेवणं त्यामुळे शक्यच नव्हतं. डॅनियलनं मुलाखत देण्याचं मान्य केलं.

तो बातमीदारांच्या समोर बसला. त्यातल्या एकानं अचानक त्याच्या हातात एक कागदाचा तुकडा दिला आणि वाचायला सांगितलं. तो टेलेक्सवरून आलेला संदेश होता. सोळा जणांनी माणसाचं मांस खाल्ल्याविषयी त्यात उल्लेख होता.

‘ याबाबत मला काही एक बोलायचं नाही. ’ तो म्हणाला.

‘ तुम्ही हे मान्य करणार का नाकारणार ?’ वार्ताहरानं विचारलं.

‘ माझे सगळे मित्र युरुग्वेला परतल्याशिवाय त्या विषयावर मी अवाक्षरही बोलणार नाही !’

हा संवाद चालू असताना डॅनियलच्या वडिलांनी टेलेक्स-संदेश वाचला. ‘ ज्या कोणी हे लिहिलंय तो एकनंबरचा हलकट प्राणी आहे. धादांत खोटं आणि ज्यानं हे इथं आणलं तो पाजी, बदमाश आहे !’ ते इतके संतापले होते की त्यांच्या तोंडातून शब्द नीट फुटेनात. त्या हुषार वार्ताहराला ते दरवाजाच दाखवणार होते; पण त्यांच्या एका मित्रानं त्यांना आवरलं. मग वार्ताहर आपण होऊन बाहेर निघून गेला.

त्यानंतर मुलाच्या जवळ जाऊन ते म्हणाले, ‘ हे बघ, चिठ्ठीतला मजकूर साफ खोटा आहे असं तू सांगून का टाकत नाहीस ?’

‘ ते खरं आहे. ’ डॅनियल सावकाशपणे म्हणाला.

क्षणभर त्यांचा विश्वासच बसेना. त्यांनी नाराजीनं मुलाकडे पाहिलं; पण लगेच त्यांच्या लक्षात आलं की गरजेमुळे मुलांना तसं वागावं लागलं होतं आणि आजपर्यंत ते आपल्या कसं ध्यानात आलं नाही याबद्दल त्यांनाच आश्चर्य वाटू लागलं. ¤

## : ४ :

२८ डिसेंबरची दुपार. प्युडाहेल विमानतळावर बोइंग ७२७ हे विमान ६८ उतारूंना युरुग्वेकडे घेऊन जाण्याच्या तयारीत होतं. बचावलेल्या मुलांना आणि त्यांच्या नातलगांना चिलीच्या नागरिकांनी संस्मरणीय असा निरोप दिला होता. मुलांना तर वागणूक खरोखर उत्तम मिळाली होती.

खराब हवामान असल्याचा संदेश आल्यामुळे ठरल्या वेळेला विमान निघालं नाही. त्यामुळे वातावरण थोडं गंभीर बनलं. मुलांच्या नाजुक प्रकृतीमुळे रेल्वेनं किंवा बसनं जाऊ नये असं त्यांना सांगण्यात

आलं होतं. म्हणूनच केवळ ते विमानातून जायला तयार झाले होते.

शेवटी एकदाचं विमान उडालं. सगळ्यांना पुढचे वेध लागले होते. पुन्हा पर्वतावरून जाण्याच्या कल्पनेमुळे मनात भीती तर होतीच; पण युरुग्वेला पोचल्यावर कशा-कशाला तोंड द्यावं लागणार हे त्यांना समजत नव्हतं. काही ना काही विषय काढून गप्पात मन गुंतवायचा प्रयत्न ते करीत होते.

मॉन्टेव्हिडिओचा कॅरास्को विमानतळ जवळ आला. मुलं आरोळ्या ठोकू लागली. 'हुर्रे, हुर्रे.' त्यामुळे सर्वांचं मनोधैर्य एकदम वाढलं. त्यांची प्रिय प्लेट नदी पुन्हा एकदा दिसू लागली. तिचं शेवाळलेलं पाणी, घरांची छतं आणि रस्ते. सर्वजण एकदम त्यांचं राष्ट्रगीत गाऊ लागले.

ओरिएंटल्स्, अवर कंट्री ऑर दि ग्रेव्ह,

लिबर्टी, ऑर डेथ वुइथ ग्लोरी......

अखरचे शब्द ओठांबाहेर पडताच विमानानं युरुग्वेच्या भूमीला स्पर्श केला.

अकरा आठवड्यांपूर्वी विमान असंच निघालं होतं. त्याच जागी आता नवं विमान धावपट्टीवर उभं होतं. निघताना फक्त दोन-तीन कुटुंबं निरोप द्यायला आली होती; पण आता जणु सारं शहर त्यांच्या स्वागताला हजर होतं. देशाच्या अध्यक्षांची पत्नी देखील उपस्थित होती. सर्वत्र गडबड, रुमाल उडवणे आणि धावपळ चालू होती. पोलिसांना गर्दीवर ताबा मिळवता मिळवता नाकी नव आले.

सर्व उतारू विमानातून लगेच जवळच उभ्या असलेल्या बसेसमधे चढले. स्टेला मॅरिस कॉलेजकडे ते निघाले होते. तिथे त्यांच्या आगमनाची सर्व काही सिद्धता झाली होती. मुलांचं न भूतो न भविष्यति असं स्वागत त्या ठिकाणी झालं. अपघातात ठार झालेल्या दुर्दैवी मुलांच्या नातलगांना आणि दोस्तांना त्यांची अनुपस्थिती अर्थातच क्लेशकर झाली होती.

बसण्याची व्यवस्था चोख होती. सर्वजण आपापल्या आसनावर बसले. तुडुंब गर्दी. बातमीदार बहुसंख्य होतेच. साऱ्या जगातून ते आले होते. टी. व्ही. चे लोक. फोटोचे फ्लॅश क्षणाक्षणाला उडत होते आणि कॉन्फरन्स सुरू झाली.

वाचलेल्या मुलांनी पाळीपाळीनं आपले अनुभव सांगायचं ठरवलं होतं. ते झाल्यावर बातमीदारांना प्रश्न विचारण्याची मोकळीक होती. चिंता फक्त मांसभक्षणाबाबत कसं सांगावं ही होती. काही जणांच्या मते स्पष्टपणे ते सांगायला हरकत नव्हती, तर काहींना वाटत होतं की त्या विषयावर मौन पाळणं हिताचं.

त्यातून मार्ग निघाला : इन्सार्तेनं सौम्य शब्दात काय ते बोलावं; पण आयत्या वेळेला तो कच खाऊ लागला. आपल्याला बाजू नीट मांडता येईल का नाही अशी शंका त्याला येऊ लागली. सगळ्यांच्या समोर आपली दाणादाण उडेल असं त्याला वाटलं. त्यामुळे पँकोन त्याच्याऐवजी बोलायचं मान्य केलं.

सर्वत्र पूर्ण शांतता झाली. मुलांचे एकामागून एक अनुभव ऐकताना श्रोते अवाक् झाले. अखेर पँको डेलगॅडोची पाळी आली. त्यानं दमदारपणे बोलायला सुरुवात केली. ही त्याची उत्स्फूर्त कला पर्वतावर असता कुठे लुप्त झाली होती कोणास ठाऊक.

'पर्वतावरील एकांतात सकाळी जाग आली की चारी बाजूंना बर्फाच्छादित शिखरं दिसतात. ते दर्शन भव्य, उदात्त, काहीसं भीतिदायक असतं. तिथे प्रत्येकाला एकटं-एकटं, सुनं-सुनं वाटू लागतं— ईश्वराचं अस्तित्व सोडून. मी शपथपूर्वक आपल्याला सांगतो की त्या ठिकाणी ईश्वराचा वास आहे. आम्ही कोणीही फारसे धार्मिक प्रवृत्तीचे नसलो तरी सगळ्यांना तोच अनुभव आला. हृदयात जाणवला. त्याचं सामर्थ्य किती अचाट असलं पाहिजे ! आम्हाला त्यानं सुखरूप बाहेर आणलं, मार्गदर्शन केलं......आणि जेव्हा आमच्या जवळचा अन्नाचा शेवटचा कण संपला तेव्हा आम्हाला ख्रिस्ताच्या अखेरच्या बलिदानाची -निर्याणाची आठवण झाली. त्यानं धर्मासाठी आपलं शरीर अर्पण केलं. त्यामुळे आम्ही ठरवलं की प्राप्त झालेल्या नाजुक परिस्थितीत आपल्या मृत साथीदारांचं मांस खाण्यात वावगं असं काही नाही. आम्ही आज जे जिवंत दिसतो आहोत ते त्यामुळेच. आमच्या देशबांधवांसमोर आम्ही मन उघडं करीत आहोत. जसं घडलं तसं सांगणं आमचं कर्तव्य आहे......'

पँकोच्या भावनेनं ओथंबलेल्या वक्तव्यामुळे सगळ्यांचीच अंतःकरणं हेलावली. श्रोतृवृंद भारावून गेला होता. वार्ताहरांजवळ विचारायला प्रश्नच उरले नाहीत. मृतात्म्यांना श्रद्धांजली देण्यासाठी एक मिनिट स्तब्ध उभं राहून तो कार्यक्रम संपला. ◻

## : ५ :

त्यानंतर सुटका झालेली मुलं आपापल्या घरी गेली. अँडीजमधे याच दिवसाचं स्वप्न ती बघत होती. देशात परतल्यावर अपेक्षित असलेल्या संभाव्य संकटाला यशस्वीरीत्या तोंड देऊन निर्धास्त मनानं त्यांनी 'गृहप्रवेश' केला.

पण मनात खोलवर उमटलेला ठसा सहजासहजी पुसला जाणं शक्य नव्हतं. काही मुलं गप्प गप्प राहू लागली, तर काही त्रासिक बनली. बारीक-सारीक गोष्टींमुळे सुद्धा त्रागा करू लागली, लहरीपणानं वागू लागली. हळवी झाली. जेवण समोर दिसलं की मुलं त्यावर तुटून पडत. पोट तुडुंब भरलं तरी त्यावर चॉकलेट किंवा गोळ्या खात. कॅनेसा तर थोड्याच दिवसात खूप फुगला.

त्यांचे पालक मुलांच्या वागणुकीमुळे हवालदील झाले. मानसोपचार तज्ज्ञदेखील त्यावर काही उपाय करू शकत नव्हते. अशा केसेस पूर्वी क्वचितच झाल्या असतील. काळ हेच त्यावरचं औषध होतं. वाट पाहिल्याखेरीज गत्यंतर नव्हतं. पालकांना त्या गोष्टीचा धक्काच बसला होता. ज्यांची आशा सोडली होती, ती प्रत्यक्ष अशा स्थितीमधे परतल्यामुळे ते खचून गेले होते. इन्सार्तेची आई तर त्याला क्षणभर डोळ्यांआड करायची नाही. रात्री तो झोपल्यावर त्याच्याकडे ती एकटक बघत रहायची.

काही वृद्ध आयांना 'मुलं नरमांस खाण्याऐवजी मेली असती तरी हरकत नव्हती' असं वाटत होतं. त्यांना ती कल्पनाच सहन होऊ शकली नाही.

कॅथॉलिक चर्चनं मात्र त्वरेनं जाहीर केलं की, 'मुलांना यत्किंचितही दोष द्यायचं कारण नाही. जगण्याचा तोच एकमेव मार्ग त्यांच्यासमोर होता... मृतांची शरीरं त्यायोगे सत्कारणी लागली. नुकत्याच



# तर आम्ही विमानाचा पत्रासुद्धा खाल्ला असता !....

फरनँदो पेरँडो हा फेअरचाइल्डच्या अपघाताचे वेळी फक्त चोवीस वर्षांचा होता. मेकॅनिकल इंजिनियरिंगची पदवी संपादन केल्यानंतर तो मॉन्टेव्हिडिओमध्ये आपल्या वडिलांच्याच कंपनीत काम करत होता. त्याच्या प्रभावी नेतृत्वामुळे सोळाजण वाचू शकले, असे म्हटले तरी चालेल.

अमेरिकेतील 'न्यूजवीक'च्या पॅट्रिशिया सेठी यांनी न्यूयॉर्कमधे पेरँडोची मुलाखत घेतली. त्याचा सारांश प्रश्नोत्तररूपाने दिलेला आहे.

¤ अँडीजमधील संकटात, नरमांसभक्षण हा सर्वांत नाट्यमय प्रकार आहे. तुमचे यावर काय मत आहे ?

– तसे मुळीच नाही. त्यामुळे आम्ही जिवंत बाहेर पडू शकलो इतकेच. महत्त्व पोट भरण्याला होते, काय खातो याला नाही. भूक भागवण्यासाठी एखादा धातू खाल्लेला चालला असता तर आम्ही विमानाचा पत्रासुद्धा खाल्ला असता; पण ते शक्य नव्हते.

¤ साऱ्या अनुभवातील जास्तीत जास्त दुःखदायक भाग कोणता ?

– माझ्या दृष्टीने अर्थातच आई आणि बहिणीचा मृत्यू; पण त्यानंतर मी दृढनिश्चयी बनलो. वडलांची आठवण सतत व्हायची. मला जिवंत राहणे भाग होते. मी स्वतःला बजावले : या ठिकाणाहून बाहेर पडण्यासाठी मी वाट्टेल ते करीन. गोठून जाईन, हातपाय नष्ट होतील; पण रांगत का होईना, मी पर्वत पार करीन आणि वडलांना सांगीन की मी जिवंत आहे. एखाद्या व्यक्तीवरील प्रेम ही प्रचंड शक्ती आहे. त्याच सामर्थ्यावर मी जिवंत राहिलो.

¤ पुस्तकात लिहिल्याप्रमाणे तुम्ही सर्वांत आधी पायलटचे मांस खावे असे सुचवले ना ?

– अपघातानंतर आठव्या दिवशी खाण्यासाठी काहीएक शिल्लक नव्हते. मृत्यू सर्वांभोवती घिरट्या घालीत होता. एकमेकांकडे बघत आम्ही सुन्नपणे बसून होतो. नरमांस खाण्याचा विचार प्रत्येकाच्या मनात आलाच होता; पण उघडपणे मी तो आधी मांडला इतकेच. त्यावर विचारविनिमय झाला आणि जिवंत राहण्यासाठी दुसरा पर्याय नसल्यामुळे तसा निर्णय घेतला.

¤ त्यानंतर तुमची धार्मिक प्रवृत्ती वाढली की कमी झाली ?

– वाढली. आम्ही ईश्वराच्या इतके निकट होतो की जणु त्याला स्पर्श करू शकत होतो. त्यानेच आम्हाला मार्ग दाखवला. त्या वेळी वजन ७० पौंड घटलेले, कपडे आणि बूट घाणेरडे होते. १४००० फूट उंचीवरून त्या स्थितीत उभा चढ आणि उतार ओलांडून– तेही बर्फावरून–जाणे हे आमच्या शक्तीबाहेरचे काम होते.

¤ ज्या ईश्वराने तुम्हाला वाचवले, त्यानेच तुमच्या आईला व बहिणीला वाचवले नाही, या विचारामुळे कधी गोंधळ होत नाही ?

– सुरुवातीला झाला होता; पण हा ईश्वराचा खेळ आहे, त्यात तर्काला स्थान नाही असे मी मानतो. कदाचित त्या दोघी स्वर्गात इथल्यापेक्षा अधिक सुखी असतील. जीवन हा अपघात आहे; पण मृत्यू अटळ, सत्य आहे. किती जगणार, जगणार का नाही हे आपल्याला ठाऊक नसते; पण मृत्यूविषयी पूर्ण खात्री असते.

¤ सत्तर दिवसांच्या सत्त्वपरीक्षेनंतर तुमचे जीवनविषयक तत्त्वज्ञान बदलले का ?

– पर्वतावर आम्ही जसे चांगले वागलो, तसेच इथेही वागण्याचा मी निश्चय केला. निःस्वार्थी, समजूतदारपणे. ही गोष्ट इथल्या जगात अवघड जाते; पण सुखाविषयीच्या माझ्या कल्पनाच बदलल्या. एक ग्लास पाण्यासाठी तिथे दोन तास बर्फ वितळवावा लागे. इथे नळ सोडला की पाणी, उबदार शय्या, खायला भरपूर. अशा एकेक क्षणासाठी कोणीही वाट्टेल ते केलं असतं.

¤ त्या अनुभवामुळे तुमच्या जीवनाला कलाटणी मिळाली का ? तुम्ही स्वतःला हीरो मानता का ?

– कलाटणी तर मिळालीच. आत्मविश्वास खूप वाढला. मी आता निर्णय जलद घेऊ शकतो. मी स्वतःला हीरो मात्र समजत नाही. पूर्वीसारखेच जीवन मी जगत आहे. फरक फक्त एवढाच आहे की लोकांची माझ्याकडे बघण्याची भावना बदललेली आहे.

¤ तुमच्याकडे नेतृत्व कोणत्या गुणांच्या जोरावर आले ?

– ते आतूनच आले. माझ्यात इतके धैर्य असेल याची आधी कल्पनाच नव्हती. विशिष्ट परिस्थितीत माणसाचा कायापालट होतोही. स्वत्व बाहेर येते.

¤ मृत मित्रांच्या पालकांच्या तुमच्याविषयी काय प्रतिक्रिया व्यक्त झाल्या ?

– त्यांनी आमचे उत्स्फूर्त आणि हार्दिक स्वागत केले. अपेक्षेपलीकडे ते होते. आश्चर्य वाटेल पण ते म्हणाले की विमानात ४५ जण होते. त्यामुळे १६ तरी बचावले. जगणे कोणाच्याही हातात नाही हे त्यांनी ओळखले होते.

¤ माणसांत परतल्यानंतर नरमांस–भक्षणाची आठवण होऊन तुम्हाला स्वतःची घृणा वाटली का ? त्यासाठी मानसोपचार घ्यावे लागले ?

– कोणालाही तशी गरज वाटली नाही. मित्रांचे मांस खाणे ही कल्पनासुद्धा शहारे आणणारी आहे; पण माझ्या विवेकबुद्धीला कसलाही त्रास झाला नाही. पुन्हा त्याच परिस्थितीत अडकून पडावे लागले तर पुन्हा तेच करावे लागेल. ■

**[ पुणे येथील ' फिनिक्स लायब्ररी 'च्या सौजन्याने ]**

मेलेल्या माणसाचे डोळे किंवा अन्य अवयव जिवंत माणसाला बसवतात ना? तसं स्वर्गात गेलेल्या मुलांनी आपलं मांस बांधवांच्या जीवितरक्षणासाठी दिलं... त्या परिस्थितीत आपण तरी वेगळं काय केलं असतं? आपण त्यांना दोष देता कामा नये. निर्जीव शरीराचा वापर करण्यात–तेही जगण्यापुरता– काहीही पाप नाही!'

हळुहळू वादळ शांत झालं. मुलांचा त्यांच्या ऐतिहासिक पराक्रमामुळे सगळीकडे सन्मान होऊ लागला. रेडिओ- टी. व्ही.वर त्यांच्या कित्येक मुलाखती झाल्या. युरुग्वे हा देश जगाच्या दृष्टीनं अत्यंत छोटा होता; पण या गोष्टीमुळे साऱ्या जगाचं त्याच्याकडे लक्ष वेधलं. त्यांचं धैर्य, चिकाटी, एकी इ. असलेल्या–नसलेल्या गुणांवर असंख्य लेख प्रसिद्ध झाले. बऱ्याच मुलांनी वाढलेली दाढी आणि केस तसेच राखले. त्यांना व्ही. आय्. पी.सारखी वागणूक मिळू लागली.

पँकोनं, संकटकाळात काय खावं लागलं हे सांगायचं धाडस दाखवल्यामुळे साहजिकच त्याचा भाव वाढला. त्यानं टी. व्ही.ला एक प्रदीर्घ अशी खास मुलाखत दिली.

परॅडोचाही अपघातानंतर कायापालट झाला होता. त्याचा भित्रा, लाजरा आणि विक्षिप्त स्वभाव कुठल्या कुठे लुप्त झाला होता.त्याची व्यक्तिरेखा आता प्रभावी, खंबीर बनली. त्याच्याच नेतृत्वामुळे अखेरची मोहीम यशस्वी झाली होती. बाकी त्याचं पूर्वीचंच जीवन पुन्हा सुरू झालं. गाडी घेऊन समुद्रकिनाऱ्यावर भटकणे. पूर्वी त्याला बावळट समजणाऱ्या कित्येक सुंदर मुली आता त्याच्याभोवती गोळा झाल्या होत्या. त्याचं प्रेम संपादन करण्यासाठी एकमेकीत चढाओढ सुरू झाली. तो कुठेही गेला तरी वार्ताहर आणि फोटोग्राफर त्याच्या मागोमाग जात.

इतर पंधरा जणांचं प्रस्थही वाढलेलं होतंच. मुख्य म्हणजे सर्वांची एकी पहिल्यासारखीच टिकून होती. मनात प्रत्येकाला वाटायचं की सुटका होण्यात आपला फार महत्त्वपूर्ण वाटा होता. ते थोडं खरंही होतंच. नुसत्या प्रार्थनेवर कोणीच विसंबून राहिलं नव्हतं. नाही तर एव्हाना सगळे पर्वतामधेच गाडले गेले असते. अर्थात ईश्वरानं त्यांना हालचाल करण्याची प्रेरणा दिली यावरही त्यांची श्रद्धा होती.

सगळ्या मुलांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला होता. माणुसकीवरचा विश्वासही वाढला होता. त्या अपघातामुळे त्यांना खूप शिकायला मिळालं. तिथे पाच हजार डॉलर्स जरी मिळाले असते तरी त्यांनी एकसुद्धा सिगारेट विकली नसती. त्यांच्या फाजील अपेक्षा केव्हाच नष्ट झाल्या होत्या. सुधारलेल्या, ऐषारामी जगात वावरताना मनातून ते स्थितप्रज्ञ बनले होते. घरच्या लोकांवर ते कमालीचं प्रेम करू लागले, तसंच साऱ्या जगावरही.

## : ६ :

एकोणतीसजण परतले नव्हते. त्यांच्या मृत्यूविषयी नातलगांची खात्री झाली होती. एवल आणि नोगायराला मरताना किती यातना झाल्या याचं वृत्त एव्हाना त्यांच्या आई-वडलांना समजलं होतं. त्यामुळे सर्वजण अत्यंत अस्वस्थ बनले. न परतलेले लोक–कोणाचे भाऊ, बहिणी, पत्नी, नवरा–नुसतेच मेले नव्हते तर त्यांना बाकीच्यांनी खाल्लंसुद्धा होतं. नक्की कोणाकोणाला खाल्लं ते समजलं नव्हतं. आपल्या प्रिय व्यक्तीच्या शरीराचा वापर त्या प्रकारानं व्हावा हे सहन होणं किती अवघड होतं; पण त्यांनी वरून तसं दाखवलं नाही. पंचेचाळीस उतारू असल्यामुळे सोळा मुलं तरी वाचू शकली हे सत्य त्यांना पचवावं लागलं. आर्चरो नोगायराच्या वडलांनी वर्तमानपत्रात आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी सोळा मुलांच्या धैर्याचं आणि निर्णयशक्तीचं कौतुक केलं. मृत व्यक्तींच्या पालकांनी मनात थोडीसुद्धा कटुता ठेवू नये असं आवाहन त्यांनी तळमळीनं केलं.

कित्येक आयांनी तसंच धैर्य दाखवलं. बचावलेल्या मुलांना स्वतःच्या मुलाचे जागी त्या मानू लागल्या. आपल्या मुलाऐवजी दुसरा एखादा मेला असता तर त्याच्या आईनं काय केलं असतं, हा समंजस विचार त्यांनी केला. सर्वच्या सर्वजण मरण्यापेक्षा निदान सोळा तरी जिवंत परत आले हे काय थोडं झालं? पण हिमसंकटात गाडल्या गेलेल्या मुलांबद्दल त्यांना फार दुःख झालं. विशेषतः मार्सेलो पेरेझच्या घरी.

जिरार्ड क्रॉयसेटच्या भविष्यवाणीनं पालकांची दिशाभूल केली असली तरी त्याचं बरंचसं खरंही ठरलं होतं. त्याला दोष देण्यात अर्थ नव्हता. मुलांचा शोध घेण्याच्या अनेक मार्गांपैकी तीही एक उपाययोजना होती.

## : ७ :

युरुग्वे आणि चिलीच्या एअर-फोर्सनं अपघातामागील कारणांचा तपास सुरू केला. अँडीजच्या मध्यावर असताना गैरसमजुतीमुळे वैमानिकानं विमान खाली वळवलं होतं. सारी जबाबदारी त्याच्यावरच पडत होती. अपघातस्थळ क्युरिकोला मुळीच जवळचं नव्हतं. जिथे मुलांनी सत्तर दिवस काढले, ते ठिकाण सॉसनीडो आणि टिंग्वीरिरिका ज्वालामुखीच्या मध्यावर होतं. फेअरचाइल्डचा सांगाडा ११,५०० फुटांवर होता. मोहिमेतल्या दोन मुलांनी १३,५०० फूट उंचीचा पर्वत ओलांडला होता. असं लक्षात आलं की जर त्यांनी पर्वत चढण्याऐवजी शेपटीच्या भागाच्या दिशेनं दरी पार केली असती तर तीन दिवसांत ते रस्त्याला लागले असते. (कॅनेसाला जो रस्ता वाटत होता, तसा प्रत्यक्षात तिथे नव्हताच.) फेअरचाइल्डपासून अवघ्या पाच मैलांवर पूर्वेकडे एक हॉटेल होतं. ते फक्त उन्हाळ्यात उघडं राही; पण तिथं पॅकबंद डब्यांत भरपूर अन्नसाठा होता.

रेडिओवरून मदतीसाठी संदेश देण्याच्या खटपटीत त्यांनी दोन आठवडे वाया घालवले होते. त्यात ते कधीच यशस्वी होणार नव्हते. कारण बॅटरीचा विद्युत्प्रवाह जो ११५ व्होल्ट्स ए. सी. लागतो, तो प्रत्यक्षात अवघा २४ डी. सी. होता.

युरुग्वे एअर-फोर्सच्या निष्काळजी वैमानिकामुळे अपघात घडला होता, म्हणून सुरुवातीला पालकांना खूप राग आला खरा; पण ईश्वराची लीला अगम्य आहे अशी समजूत सर्वांनी शेवटी करून घेतली.

जेव्हियर मिथॉल समुद्रकिनाऱ्याजवळ राहू लागला. मुलांच्या संगोपनाकडे त्यानं पूर्ण लक्ष दिलं. एका संध्याकाळी वाळूवरून चालताना त्याच्या तीन वर्षांच्या मुलीनं–मारीनं–त्याला मान वर

करून विचारलं, 'पपा, तुम्ही स्वर्गातून परत आलात हे खरं ना? मग आपली आई कधी परत येणार?'

मुलीजवळ खाली बसून जेन्हियरनं तिचे छोटे हात हातात घेतले. 'हे बघ, मारी; तुझी ममा इतकी इतकी चांगली आहे की देवाला तिची फार गरज आहे. त्यामुळेच त्यानं तिला स्वतःजवळ कायमचं ठेवून घेतलेलं आहे.' ◻

## : ८ :

१८ जानेवारी १९७३ ला, अँडीज सुटका-समितीचे काही सदस्य, युरुग्वे एअर-फोर्सचे दोन अधिकारी आणि कॅथॉलिक धर्मगुरु फादर इव्हान केव्हिडस हेलिकॉप्टरमधून फेअरचाइल्डजवळ उतरले. मृतांचे सांगाडे शोधण्यासाठी काही दिवस तंबू ठोकून तिथंच मुक्काम करायचा त्यांचा विचार होता. बर्फ वितळल्यामुळे ते आता दिसू लागले होते. पर्वतमाथ्यावर पडलेली तीन प्रेतं त्यांनी खाली आणली.

अपघातस्थळापासून अर्ध्या मैलावर एक जागा निवडण्यात आली संभाव्य वादळापासून बचाव होऊ शकेल अशा त्या ठिकाणी मृतांचं स्मृतिचिन्ह उभारण्याचं ठरलं. त्या ठिकाणी, जशीच्या तशी टिकून राहिलेली शरीरं आणि सांगाडे पुरण्यात आले. त्यावर मोठ्या आकाराचे दगड व्यवस्थित रचण्यात आले आणि तीन फूट उंचीच लोखंडी क्रॉस त्याच्यावर ठेवण्यात आला. त्याला केशरी रंग दिल होता. त्याच्या एका बाजूला, 'युरुग्वेच्या बांधवांना साऱ्या जगाची मानवंदना,' आणि दुसऱ्या बाजूला, 'हे ईश्वरा, आम्ही तुझ्या निकट आहोत,' असं लिहिलं होतं.

त्यानंतर फादर इव्हाननं प्रार्थना म्हटली. पर्वतावर हजर असलेले इतर लोक त्यात सहभागी झाले. निघण्यापूर्वी फेअरचाइल्डच्या सांगाड्यावर सर्वत्र पेट्रोल शिंपडून ते पेटवण्यात आलं. जोरदार वाऱ्यांमुळे बघता बघता विमान जळून गेलं. सर्वांनी निघण्याची तयारी केली. पर्वतावरील स्तब्धतेचा, कडे कोसळण्याच्या आवाजांमुळे सतत भंग होत होता. तशा परिस्थितीत त्या ठिकाणी अधिक काळ राहणं केव्हाही शहाणपणाचं नव्हतं.

**स मा प्त**




# फ्रॉम रशिया विथ लव्ह

I want to live and give my country
The final throb of my pulsating heart
So I may say when death comes :
I gave my life to motherland.

त्याचा आवाज त्याच्या देशापर्यंत पोचलाच नाही. नाझींनी त्याला गोळ्या घातल्या तेव्हा त्याच्या ओठावर वरील ओळी होत्या.

१९४२ साली तो हिटलरच्या नाझी सैन्याकडून पकडला गेला. शत्रूच्या हाती जिवंत लागण्यापेक्षा मेलेले बरे म्हणून त्याने स्वतःला गोळी घालायचा प्रयत्न केला. त्याच्या पिस्तोलानं त्याला दगा दिला. जखमी स्थितीत तो शत्रूच्या हाती पडला अन् नंतरची सगळी कथा म्हणजे यातनाशिबिरांची आहे. तिथेही त्याने काही सहकाऱ्यांसोबत पळून जाण्याचा प्लॅन बनवला; पण तोही असफल राहिला. त्याला मोआबित जेलमधे डांबण्यात आलं.

रशियन सैनिकांनी बर्लिनचा ताबा घेतला अन् एका रशियन सैनिकाच्या हाती वाऱ्याबरोबर उडत आलेला अर्धाअधिक जळलेला कागदाचा चिटोरा लागला. त्या चिटोऱ्यावर लिहिलं होतं–मी मूसा जलील. फॅसिस्टांच्या विरुद्ध लढल्याबद्दल मी मोआबित जेलमधे बंदी आहे. मला मृत्युदंड देण्यांत आला आहे. कुणाही रशियन माणसाला माझा हा कागद सापडलाच तर माझ्या देशाप्रती माझ्या शुभेच्छा पोचत्या कराव्यात.

काही दिवसांनी ॲन्ड्री थिमरमन्स नावाच्या एका गृहस्थानं ब्रुसेल्समधल्या सोवियत वकिलातीला भेट देऊन कैद्यांना देण्यात येणारं प्रार्थनापुस्तक अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलं. तोही मोआबित जेलमधे मूसा जलीलबरोबर होता. प्रार्थनापुस्तकाच्या पानात एक संदेश होता. तेवढाच फक्त रशियन भाषेत होता. बाकी सारं अरेबिकमधे होतं–मूसा जलीनने मृत्यू पुढचात चालून येत असताना एकूण ११५ कविता लिहिल्यात. तो त्या कवितांच्या भविष्याविषयी काळजीत आहे.

रशियन साहित्यिक, सैनिक त्यानंतर त्याच्यासंबंधी कुठे माहिती किंवा त्याच्या कविता कुठे मिळतील ह्याच्या मागावर निघाले. मोआबित जेलमधल्या त्याच्या सोबत बंदिवान असणाऱ्या त्याच्या काही मित्रसैनिकांनी त्याच्या काही कविता मुखोद्गत केल्या होत्या. काही त्यांनी लपवून लिहून ठेवल्या होत्या नि एकानं दुसऱ्याच्या स्वाधीन करीत त्या जेलच्या बाहेर काढल्या होत्या.

आणि त्याच्या अशा जमवलेल्या कविता आता रशियन जनतेची जपलेली संपत्ती आहे.

त्याने भोगलेल्या यातना, त्याचा मृत्यू रशिया विसरू शकत नाही. त्याला हिरो ऑफ सोवियट युनियन हा किताब आणि लेनिन-पारितोषिक त्याच्या मृत्यूपश्चात देण्यात आले.

त्याच्या कविता आजही ओठावर येतात तेव्हा मुठी वळतात.

Songs have taught me to love my freedom
Songs will help me to die without fright
My life has been like a song to the people
My death will resound as a call to fight.

**–झिरो–झिरो–सेव्हन**

---

एक दिवस गॉर्की आणि लिओ टॉलस्टॉय सायंकाळचे फिरायला जात होते. एकदम टॉलस्टॉय थांबले. गोर्कीला हातानं धरून म्हणाले–

'माणूस भूकंप, महामारी, रोग आणि दैवी प्रकोप सहन करू शकतो; परंतु मानवी जीवनाची मगळचात मोठी त्याला छळणारी शोकांतिका कोणती असेल, ( अन् ती सदैव र्‍हील ) तर त्याच्या शय्यागृहातील BedRoom ) शोकांतिका आहे.'

□

---

नुसताच बर्फाळ प्रदेश...एखाद्या कोऱ्या कागदासारखा सपाट...उंचवटे नाहीत...झाडं नाहीत...झुडुपं नाहीत ... अधूनमधून डोकावणाऱ्या तुरळक काटक्या आहेत... अशा ह्या प्राणहीन बर्फाच्या वाळवंटात ह्या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यंत एक पिवळसर पट्टी, धूसरशी दिसणारी. बहुतेक रस्ता असावा तो...त्यावर दोन बुटांची लांबवर जाणारी चिन्हं दिसत आहेत...पाय नाहीतच. नुसत्या पावलांच्या खुणा.

–टॉलस्टॉयनं पाहिलेलं स्वप्न !

आणि एक दिवस तो सगळं मागं सोडून निघून गेला त्या बर्फाळ प्रदेशात. त्याच्या शोधात जे होते त्यांना फक्त पावलांच्या खुणा दिसत होत्या. तो कुठेच नव्हता. त्याचं मृत शरीर बर्फाच्या थराखाली सापडलं.

□



आंतर महाविद्यालयीन

# पुरुषोत्तम करंडक एकांकिका-स्पर्धा

वि. भा. देशपांडे

पुण्याच्या महाविद्यालयीन कलाजीवनात 'पुरुषोत्तम करंडक स्पर्धा' ही एक प्रतिष्ठेची गोष्ट आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक महाविद्यालय कमालीचे उत्सुक असते. ती उत्सुकता वर्षानुवर्षे वाढत आहे याचा प्रत्यय याही वर्षी आला. या वर्षी १६ महाविद्यालयांतील ११६ कलाकारांनी ही स्पर्धा घडवली.

स्पर्धेचा संख्यात्मक विस्तार पुरेसा बोलका आहे; परंतु गुणात्मक विस्ताराचा आलेख चढत्या श्रेणीचा वाटला नाही. प्रयोगदृष्ट्या उत्तम श्रेणीच्या अशा तीनच एकांकिका झाल्या असे मला वाटते. त्या म्हणजे १. यातनाघर २. पाचर ३. ब्रीज. २३ एकांकिकांमध्ये ३. एकांकिकाच समाधानकारक होणे ही कलाविकासाच्या किंवा कलागुणवृद्धीच्या दृष्टीने फारशी समाधानकारक गोष्ट नाही. या दोन-तीन एकांकिकांमध्येच सांघिक पारितोषिके विभागली जाणार हे उघडच होते. शेवटी तसेच झाले. अपेक्षा अशी होती की, आठ ते दहा एकांकिका प्रथम श्रेणीच्या, सहा ते आठ दुय्यम श्रेणीच्या आणि उरलेल्या तिसऱ्या श्रेणीत असतील. असे जर घडते तर स्पर्धेची रंगत वाढली असती. पारितोषिक कोणाला जाणार याचा ताण वाढला असता. या वर्षी तसा तो वाढला नाही. सर्वसामान्य स्पर्धेचा निकाल काय लागेल हे थोड्याफार फरकाने कोणीही सांगू शकत होते. एका प्रेक्षकाचा आणि परीक्षकांचा निकाल तंतोतंत जुळलाही !

ही गुणवत्ता या वर्षी कमी वाटण्याची नेमकी कारणे तपासून पाहू लागलो तर विविध कारणे सांगता येतील; माझ्या दृष्टीने एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपण निवडलेल्या एकांकिकेतील नाट्यविषय व्यक्त करण्यासाठी स्वीकारलेली अभिनयाची-दिग्दर्शनाची दिशा आणि पद्धती यांचा अंदाजच अनेक संघांना आला नाही. उदा. १. 'निरंजन मला उत्तर हवंय्' (मॉडर्न), २. 'तुमचे आमचे गाणे' (होमिओपाथिक वैद्यकीय महा.) ३. 'शहामृगी' (नेस वाडिया वाणिज्य महा.) ४. 'बारा-पस्तीस' (पुणे विद्यापीठ) ५. 'कावळे' (गरवारे महा.) ६. 'पोर्ट्रेट' (नौरोसजी वाडिया) ही आणि अशीच आणखी काही महाविद्यालये सांगता येतील. या संघांच्या एकांकिका आवश्यक तो किमान परिणामसुद्धा साधू शकल्या नाहीत, उलट हास्यास्पद पातळीवर जाऊन वेगळ्या अर्थाने मनोरंजनात्मक झाल्या. हे फारसे भूषणावह नाही.

या संघांचे प्रयोग केविलवाणे होण्यामध्ये आणखी एक कारण म्हणजे तंत्राचा अकारण हव्यास. पार्श्वसंगीत आणि प्रकाशयोजना यांचा सर्रास वापर होत होता. त्यामध्ये जी किमान माहिती पडद्यामागील मंडळींना असायला पाहिजे होती तीही सुमारच असावी. कोणत्या कारणासाठी कोणत्या प्रकारची प्रकाशयोजना आपण करीत आहोत याचे अवधान राखले जात नव्हते. दिव्यांची केवळ उघडझाप एवढेच त्याचे स्वरूप राहिले. शेवटी तो एक खेळच झाला. (उदा. बारा पस्तीस, शहामृगी,) 'कावळे'तील शेवटच्या काही क्षणांची प्रकाशयोजना कल्पक आणि परिणामणारक वाटली. पार्श्वसंगीत हे बहुधा 'तयार' असलेल्या ध्वनिमुद्रिकांवरून आणलेले होते. ते प्रसंगाची परिणामकारता वाढवण्यासाठी, दोन प्रसंगांची जोड करण्यासाठी असते हे ध्यानी न घेतल्याने ते मोठ्या आवाजात प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याची व्यर्थ खटपट चालली होती. ते नाट्याशयाला पूरक ठरायला पाहिजे, वरचढ ठरता कामा नये हेही अनेकांनी ध्यानात घेतले नाही.

बी. जे. मेडिकलचा प्रयोग ही या स्पर्धेतील नेहमीच उत्सुकतेची बाब असते; पण या वर्षी या संघाने पूर्ण निराशा केली. मेडिकलची 'तो डावा हात' ही एकांकिका राजीव देशमुख या विद्यार्थी लेखकाने (?) लिहिलेली होती. एकांकिकेचा विषय, मांडणी आणि प्रयोगपद्धती सारेच भडक-उथळ, परिणामहीन असे वाटले. मेडिकलच्या जाणकार विद्यार्थ्यांकडून असे घडावे याचे आश्चर्य वाटले. त्यांचे महाविद्यालय या स्पर्धेत एक प्रतिष्ठित स्पर्धक संघ म्हणून ओळखले जाते. काही परंपरा आणि प्रथा या महाविद्यालयातील कलाकारांनी निर्माण केल्या आहेत. त्याला स्मरून एकांकिकेची निवड आणि प्रयोग समाधानकारक तरी निश्चितच व्हायला हवा. तसा झाला नाही.

ज्या महाविद्यालयांच्या संघांचे प्रयोग सुमार, नगण्य पातळीवर झाले, त्यांच्या बाबतीत महाविद्यालयातील संबंधित प्राध्यापकांनी एक तर फारसे लक्ष दिले नसावे किंवा लक्ष देऊनही विद्यार्थ्यांनी आपलाच हट्ट तरी चालवला असावा. आता अशी वेळ आली आहे की, या स्पर्धेत आपल्या संघाचा प्रयोग किमान पातळीवर असण्यासाठी स्पर्धेपूर्वी महाविद्यालयातील जाणकार-जबाबदार प्राध्यापकांनी, प्राचार्यांनी, विद्यार्थी-कलाकारांनी तो प्रयोग पाहणे महत्त्वाचे आहे. त्यांना खरोखरच त्या प्रयोगात काही आशादायक वाटले तरच स्पर्धेत जाण्यास अनुज्ञा द्यावी. याने एवढेच होईल की, स्पर्धेतल्या प्रयोगापूर्वी एक महत्त्वाची चाळणी लागेल. काही सूचना येतील. सुधारणा घडू शकेल आणि मुख्य म्हणजे स्पर्धेत होणारी फजिती टाळणे शक्य होईल. हे जर होणार नसेल तर राज्यस्पर्धेप्रमाणे पहिली फेरी आणि अंतिम फेरी अशा स्वरूपाची काही योजना करावी लागेल की काय असे वाटते.

'यातनाघर' आणि 'पाचर' हे दोन, प्रयोग त्यातल्या गुण-दोषांसह लक्षवेधी ठरले. स. प. महाविद्यालयाने सादर केलेली 'यातनाघर' ही आव्हानात्मक होती. अनेक अर्थाने अवघड होती; पण ते आव्हान मंजिरी परांजपे आणि सीमा धर्माधिकारी यांनी पेलले. या दोघींना भूमिकेची समज उत्तम प्रकारची होती. मंजिरीच्या आवाजाचे एकारलेपण आणि काही शब्दांचे वजनरहित उच्चार भूमिकेत काहीसा उणेपणा आणीत होते; पण ती उणीव तिने आपल्या अभिनयाच्या बळावर भरून काढली. सीमा धर्माधिकारी या मुलीची भूमिकेची समज-जाणकारी आणि ती व्यक्तीकरणाची क्षमता विलक्षण होती. तिची 'कमल'ची भूमिका दीर्घकाळ लक्षात राहील; पण या एकांकिकेतील दोन्ही (घोडके-सहस्रबुद्धे) पुरुषपात्रे सुमार होती. त्यांना एकांकिकेत वाव थोडाच होता; पण त्यातही त्यांनी बजावलेली कामगिरी एकांकिकेचा परिणाम

बसून तुमच्या नोकरी-उद्योगाची उभारणी करीत आहे तर शनी अकराव्या स्थानी आरूढ आहे तो तुमची आर्थिक बाजू सावरण्याचा प्रयत्न करणार आहे. या वेळी तुम्ही जर काही नवे उद्योगधंदे सुरू करायचे ठरवले असतील तर त्याला योग्य प्रतिसाद मिळू शकेल. मदत मिळेल. तुमचा व्याप या वेळी वाढणार आहे. नोकरीत तुमच्या कामाबद्दल वरिष्ठ खूष राहतील; पण तक्रारीलाही तोंड द्यावे लागेल. म्हणजे यश व अपयश असे दुहेरी काम या वेळी चालणार आहे. तुम्ही लेखक वा कलावंत असाल तर तुमचे नाव या वेळी गाजणार आहे. गौरव होणार आहे. बेकारांना आशादायक वातावरण राहील. नोकरी अगर काम त्यांना मिळू शकेल. महिलांना नोकरीत बढती मिळेल. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचे तेज पडेल. कौतुक होईल.

**तूळ** : राजकीय उत्कर्ष

लवकरच येणारी दिवाळी तुमच्या जीवनात नवा जोम व नवी महत्त्वाकांक्षा निर्माण करणार असून तुमचे राजकीय जीवन उन्नत करणार आहे हे मला आनंदाने लिहायला समाधान वाटते. राशीत रवी व राहू आले आहेत. मंगळ भाग्यस्थानी आहे तर शनी दहावा आहे. या वेळी तुम्ही म्हणाल ती पूर्व-दिशा असेच घडणार आहे. रविवार ते मंगळवार प्रवासाचा योग आहे. विशेष कामासाठी हा प्रवास होईल. नोकरीच्या बाबतीत बदल संभवतो. चालू कामात बदल होईल किंवा अधिकारात बदल होईल. कला, वाणिज्य, विज्ञान व यंत्रज्ञ यांच्या बाबतीत संबंधित असलेल्या लोकांना नोकरी मिळेल. कलावंताना मान व प्रसिद्धी मिळेल. लेखकांचे मनोगत समजून लोक त्यांच्याशी वागतील. सरकारी आश्रय मिळेल. महिलांना नृत्य, गायन व लेखन यात प्रसिद्धी व प्रेम मिळेल. विद्यार्थ्यांच्या गुणांना प्रोत्साहन मिळून त्यांच्या गुणांचे चीज होईल.

**वृश्चिक** : विचारपूर्वक वागा

ही दिवाळी व नवे वर्ष आपणास सुखाचे व समृद्धीचे जाईल यात शंका नाही. ज्योतिष हे मार्गदर्शक ठरते. म्हणून याच वेळी आपणास सांगावे लागते कीं राहू बारावा आहे, गुरु सहावा आहे याची दखल घ्या. राशिस्वामी मंगळ आठवा आहे. हे सारे ग्रहमान तुम्हाला तब्येतीला तेवढेसे अनुकूल नाही. मध्येच निराश होणे, एककल्ली वृत्ती बनणे व काही तरी कुरकुर सतत असणे असे काही होत राहील; पण घाबरण्याचे कारण नाही. नोकरीत पैशाचा व्यवहार जपून करा. जामीन कुणाला राहू नका. महिलांनी आरोग्य सांभाळून वागावे. पैसा जपून वापरा. त्यांना नोकरीत प्राधान्य मिळू शकेल. विद्यार्थी-विद्यार्थिनींना टीकेला तोंड द्यावे लागणार आहे.

**धनु** : थोडे समाधान मिळेल

सातवा मंगळ जरी कौटुंबिक जीवनास काही विलक्षण घटना घडण्याची शक्यता असली तरी त्यामुळे तुमचे तसे नुकसान होणार नाही. राहू बारावा होता तो अकरावा झाला आहे ही एक चांगली गोष्ट मानावी लागेल. अनाठायी खर्च, अकस्मात खर्च, नुकसान ह्या गोष्टी आता टळणार आहेत. नोकरीतील अस्थिरता आता कमी होणार असून तुमची घसरलेली गाडी पुन्हा रुळावर येऊ लागेल. तुम्ही लेखक असाल तर तुम्हाला काही मोबदला व प्रसिद्धी मिळणार आहे. लेखन करायला उत्साह वाटेल. तब्येत सुधारेल. तुमच्यापैकी जे लग्नाच्या बोहल्यावर उभे असतील त्यांचे विवाह ठरतील. महिलांना वाटणारी काळजी दूर होईल. मन शांत व उत्सुक बनेल. विद्यार्थ्यांची आर्थिक बाजू दुबळी राहणार नाही. चार पैसे मिळतील.

**मकर** : मानसिक शक्तीचा अभाव

केतू चौथा झाला असून तो मेषराशीस आला आहे. ही काही तुमच्याबाबतीत अनुकूल घटना म्हणतां येणार नाही. मिथुनेतील मंगळ जरी तुमच्या विरोधकांना गप्प बसवत असला तरीही तुमचे मन अस्वस्थच राहील. ही दिवाळी तुम्हाला आनंद घेऊन येईल याबद्दल मात्र खात्रीबाळगा. नोकरीच्या बाबतीत तुमच्या विरोधकांचे काही चालणार नाही. स्पर्धकांना तुम्ही धडा शिकवू शकाल. उद्योगाची परिस्थिती मात्र अनुकूल वळण घेईल. अडचणी दूर होतील. भांडवल गुंतवून धंदा करण्याच्या कल्पना मनांत घोळतील. त्याला साथही उत्तम मिळेल. राजकारण तुमच्या विरुद्ध असले तरी तुमची प्रतिष्ठा कमी होणार नाही. बेकारांना काम मिळेल. महिलांची आत्यंतिक महत्त्वाकांक्षा सफळ होईल. राजकारण व समाजकारणात प्रतिष्ठा मिळेल. विद्यार्थ्यांची आर्थिक ताकद वाढेल.

**कुंभ** : उत्कर्षाची घोडदौड

येती दिवाळी कुंभ राशीच्या लोकांना आनंदाची व राजकीय प्रतिष्ठा वाढवणारी जाईल यात मला शंका वाटत नाही. तिसरा केतू, पांचवा मंगळ, सहावा शनि आणि भाग्यस्थानी राहू व रवि एवढे ग्रह अनुकूल असताना तुम्ही जर मनाने मागे राहिला तर त्याला ग्रह तरी काय करणार आहेत? या वेळी तुम्ही तुमची विचाराची चाकोरी सोडा व राजकारणात आक्रमक पवित्रा घ्या. तुमचा हेतू व महत्त्वाकांक्षा सफळ झाल्याखेरीज राहणार नाहीत. नोकरी-धंद्याची परिस्थिती उत्कर्षाची राहील. जुन्या कामाचे मोल या वेळी तुमच्या पदरात पडेल. धंद्यातील अडचणी दूर होऊन त्याला स्थैर्य येईल. नोकरी करणाऱ्यांना पगारवाढ व भत्तावाढ मिळेल. नोकरीत बदलहि होईल. महिलांना मानसिक व शारीरिक समाधान मिळेल. नोकरीत प्रमोशन व प्रतिष्ठा मिळेल. विद्यार्थ्यांना सरकारी मदत मिळेल.

**मीन** : संयमाने वागा

आठवा रवि व चौथा मंगळ अशी या आठवड्याची ग्रहरचना आहे. दुसरा केतू देखील तेवढासा अनुकूल नाही. म्हणूनच प्रत्येक क्षेत्रात संयमाने वागण्याची जरुरी आहे. वृत्ति मिळतेजुळते घेण्याकडे ठेवा. उद्योगधंद्यांतील अडचणी या वेळी हळूहळू निवारण होऊ लागतील; परंतु नवे उद्योग सुरू करताना व्यवस्थित मार्गदर्शन घ्या. येती दिवाळी आपणास समाधानाची जाईल असं वाटत नाही. चौथा मंगळ स्थावराची उपलब्धता देणार आहे. अखेरचा प्रश्न सुटेल. स्थावरातील वाद व तंटे तडजोडीने मिटतील. तुम्हाला काही प्राप्ती होईल राजकारणात तुमचे स्थानमहात्म्य इतरांना पटणारे आहे. अचानक धनलाभाचा योग आहे. महिलांनी लॉटरीचे तिकिट घ्यावे. ज्यांचा आजवर रेसमध्ये पैसा गेला **ते या** वेळी जिंकणार आहेत. विद्यार्थ्यांचे **मनोरथ** पूर्ण होतील. मोठ्या लोकांचे त्यांना मार्गदर्शन लाभेल. □



# माधव मनोहर म्हणतात....

## Towards the understanding of drama....

## हा समीक्षणामागील हेतू असावा.

**एक मुलाखत**
**सुभाष सोनवणे**

माधव मनोहर म्हणजे नाटकवाल्याचे 'पपा !' नाटकक्षेत्रात अस्मादिक थोडीबहुत लुडबुड करीत असल्याने, ओघानेच अस्मादिकांसाठी सुद्धा ते पपांच ! काही कारणाने मुंबईला जाणे झाले, तर पपांची भेट घेतल्यावाचून चैनच पडत नाही. प्रत्येक भेटीमध्ये पपांकडून खूप-खूप आणि नवीन काही ऐकायला मिळते. माहितीमधे–ज्ञानामधे दर वेळी काही ना काही भर पडत जाते. एखाद्या वेळी मनोरंजक माहिती मिळते, उदाहरणार्थ–पपांनी अल्काझींच्या दिग्दर्शनाखाली ज्यूलियस सीझर ह्या नाटकात एकदा 'सीझर'ची भूमिका केली होती ! पपांनी 'साहित्यशास्त्रा'वर ग्रंथ लिहिण्याचा संकल्प सोडला असून त्या ग्रंथ–लेखनाची सुरुवात यंदाच्या गणेशचतुर्थीला आपण केली असल्याची माहिती मला दुसऱ्या एखाद्या भेटीत पपा देतात. एकंदरीत पपांची भेट ही मी एक पर्वणीच समजतो.

अशी पर्वणी, म्हणजेच पपांशी मनसोक्त गप्पा मारण्याची संधी आजवर अनेकदा लाभली आहे. अर्थात् 'गप्पा मारणे' म्हणजे पपांनी बोलणे आणि मी ऐकणे ! त्यात पुन्हा पपांचे बोलणे म्हणजे उदाहरणमागून उदाहरणे, संदर्भापाठोपाठ संदर्भ, अमुक मराठी नाटकाचे मूळ इंग्रजी नाटक, त्या इंग्रजी नाटकाचे फ्रेंच मूळ, त्या मुळाचं मूळ–असा थेट एखाद्या ग्रीक नाटकापाशी जाऊन पोहोचणारा हजारो वर्षांच्या पूर्वीपर्यंतचा प्रवास...!

पण अलीकडेच एकदा वाटलं की बुवा हे काही खरे नाही ! आपण 'ऐकू' शकतो, पण आपल्याला पपांशी 'बोलता' देखील यायला पाहिजे. आपल्यात आणि त्यांच्यात 'संवाद' व्हायला हवा. मग ठरवलं त्यांची एक मुलाखत घ्यायची. मुलाखतीसाठी मी विषय ठरवला–नाट्यसमीक्षण. खरे तर हा विषयही तसा लहानसहान नाही, पण सोयीसाठी त्या विषयाला खूप मर्यादित रूप द्यावे लागले. शिवाय प्रत्यक्षात जेवढी काही मुलाखत झाली, ती कागदावर उतरवताना तीमधे भरपूर काटछाटसुद्धा करावी लागली. ते असो.

'हं, सुरुवात करू या !–' पपांच्या बुक–लाइन्ड स्टडीत व्यवस्थित स्थानापन्न झाल्यावर पपा म्हणतात. संपत आलेली सिगरेट टाकून ते दुसरी पेटवतात. दरम्यान मी त्यांना पहिला प्रश्न विचारतो–'नाट्यसमीक्षा म्हणजे काय पपा ?–नाही म्हणजे, नाट्यसमीक्षेची व्याख्या वगैरे करता येईल का ?'

–'प्रत्येक व्यक्ती वेगवेगळी व्याख्या करील. नाट्य–समीक्षेलाच नव्हे, तर कोणत्याही समीक्षेला काही विशिष्ट हार्ड अँड फास्ट रूल्स् नसतात. अमुक एक नाट्यकृती पहिल्यानंतर माझ्या मनावर होणारे संस्कार माझ्या समीक्षणातून व्यक्त होतात. अनुभवाच्या या प्रतिक्रिया व्यक्तिसाक्षेप असतात. काव्य–नाट्य इत्यादि कलाकृती जशा व्यक्तित्वसाक्षपेच असतात, त्याचप्रमाणे निरनिराळ्या समीक्षकांची समीक्षणं सुद्धा व्यक्तिसापेक्षच असतात. 'कर्ण' या एकाच व्यक्ति–रेखेवर दहा जण वेगवेगळी नाटके लिहू शकतात. मर्ढेकरांच्या एकाच कवितेबद्दल अनेकांची अनेक भिन्न भिन्न मतं असू शकतात. तसंच एकाच नाटकाबद्दल समीक्षकांत मतभिन्नता असू शकते–' पपा.

–'तशी मनभिन्नता असली, तरी काही बाबी सर्व समीक्षणांच्या बाबतीत समान असाव्यात, नाही का ? म्हणजे

नाट्य-समीक्षणाची व्याख्या करता येत नसली, तरी त्यांची व्याप्ती काय असते, काय असावी; हे तुम्ही सांगू शकाल-'

-' नाट्यसमीक्षणामधे नाटकाच्या सर्व अंगांचा परामर्ष असायला हवा. नाटकाच्या लिखणापासून नेपथ्य-प्रकाश-योजनादि प्रत्येक तांत्रिक-संलग्न बाबींचाही विचार समीक्षणामधे असला पाहिजे. हा विचारही 'संपूर्ण कलाकृती' म्हणून व्हायला हवा. 'लेखन बेताचे, प्रयोग बरा-' वगैरेला तसा काही विशेष अर्थ नाही. नाटकाचे समीक्षण 'संपूर्ण कलाकृती 'बद्दल टोटल् हवे-' इति पपा.'

-' अशी 'परिपूर्ण' नाट्यसमीक्षणे सगळ्याच वर्तमानपत्रांत असतात का?'-माझा प्रश्न.

-' हे पहा, बर्नार्ड शॉनं असं म्हटलंय की ज्यांना कुठेच काही काम मिळत नाही, ते वर्तमानपत्रांत येतात! ज्याला काहीच धड करता येत नाही, तो पत्रकार होतो. प्रत्येक वर्तमानपत्राकडे प्रत्येक सदराला त्या त्या क्षेत्रातला तज्ज्ञ माणूस असतोच असं नाही-' पपा उत्तरतात.

-' मग तज्ज्ञ माणसं नसताना तथाकथित नाट्यसमीक्षणांची आवश्यकता खरोखरच आहे का?'-मी.

-' हो. समीक्षणांची आवश्यकता वाचकांसाठी असते. प्रत्येक वृत्तपत्रालाही वाटत असतं की आपल्याकडे प्रत्येक विषयाचं सदर असावं आणि प्रत्येक सदरासाठी वाचक पण असतातच.'

-' मला असं म्हणायचंय की मुंबईत एका नव्या नाटकाचा पहिला प्रयोग झाला की गावोगावच्या शेकडो-हजारो लोकांपर्यंत ते नाटक प्रथमतः जाऊन पोचते ते समीक्षणांच्या स्वरूपात. सर्वच नाट्यसमीक्षक नाट्यविषयातले जाणकार असतातच, असं नाही. अशा परिस्थितीत प्रश्न आवश्यक वाटतो की-प्रेक्षकांची मतं समीक्षणांच्या द्वारा बनतात का? म्हणजेच, पर्यायानं-नाटकाचं भवितव्य समीक्षकांच्या हाती असतं का?' -मी.

-' एखाद्या विशिष्ट समीक्षकाच्या समीक्षणामुळे एखादं नाटक चालतं वा चालत नाही, हे अगदी खरं आहे. एखाद्या मोठ्या खपाच्या वृत्तपत्रातलं समीक्षण असा काहीसा परिणाम निश्चितच घडवू शकतं. प्रेक्षकांची मतं समीक्षणामुळे कळत-नकळत बनत असतात. अनेक लोक मला पत्रातून कळवतात-' नाटक पहायचं की नाही, हे आम्ही तुमचं परीक्षण वाचून ठरवतो-' प्रेक्षकांचं-वाचकांचं नाटकाबद्दलचं फर्स्ट इंप्रेशन अशा पूर्वपरीक्षणामुळे तयार होत असतं; पण त्यातही एक गंमत आहे. लोक प्रथम नटाचं नाव वाचतात, नंतर नाटककाराचं! ज्या नावाला 'ग्लॅमर' आहे, त्या कलाकाराच्या नाटकाबद्दल एकजात सर्व समीक्षणं प्रतिकूल असूनही त्याच्या नाटकाला पब्लिक हाउसफुल् गर्दी करून जमतं-' पपा.

-' याचा अर्थ स्पष्टच बोलायचं, तर लोक एकूण समीक्षणांना फारशी भीक घालतच नाहीत! पण तरीही समीक्षणं लिहिली जातात. तुम्हीसुद्धा लिहिता. नाट्यसमीक्षा तुम्ही कोणत्या दृष्टिकोनातून करता? आपल्या समीक्षणातून तुम्हाला काय साधायचं असतं?'-मी.

-' माझ्या मते नाट्यसमीक्षण हे लोकशिक्षणाचं एक प्रभावी साधन आहे. नाटक पहाण्याची एक दृष्टी काही प्रमाणात देण्याचा मी माझ्या समीक्षणातून सतत प्रयत्न करीत असतो. टोवर्ड्स् दि अंडर स्टॅंडिंग् ऑफ् ड्रामा मी काही करू शकत असेन, तर ते महत्त्वाचं -हा समीक्षकाच्या समीक्षालेखनामागील हेतू असायला हवा-'-पपा.

-' हे तुम्ही सांगताय, म्हणजे तो हेतू तुम्ही डोळ्यांसमोर वागवता. मग तुमचा हा हेतू कितपत साध्य होतो?-' मी.

-' माझा हेतू फार थोड्या प्रमाणात साध्य होतो; पण त्यातही मला खूप समाधान आहे-'

-' एक सूर अनेकदा ऐकू येतो की माधवमनोहर क्वचितच नाटकांना चांगलं म्हणतात-ॲनी कॉमेंट्?-'

-' मी फार चांगलं किंवा फार वाईट असं कधीच लिहीत नाही. मी नाटकाचा सर्वांगीण विचार करतो. तेव्हा त्यात डावं-उजवं, बरं-वाईट हे असणारच. माझं म्हणणं असं आहे की नाटककार नाटक घेऊन दहा पावलं पुढे आला, तर समीक्षकानंही दहा पावलं पुढे यायला हवं. इट् इज् अे टू वे प्रोसेस्-' पपा म्हणतात.

-' नाटककार, नट वा निर्माता आणि नाट्यसमीक्षक यांच्यातले व्यक्तिगत हितसंबंध अगर हेवेदावे यांचा समीक्षणावर अनुकूल-प्रतिकूल परिणाम होतो का?-' मी.

-' हेवेदावे किंवा हितसंबंध हा मनुष्यस्वभाव आहे. पूर्णतः निःपक्षपाती असं कोणी असूच शकत नाही-' पपा.

-' तुम्हीसुद्धा ना?'-मी.

-' मी पक्षपाती जरूर आहे-पण जरा वेगळ्या अर्थानं. मी नेहमी नव्या प्रायोगिक नाटकांच्या बाजूनं उभा राहतो. माझे त्यातल्या त्यात 'बेटर रिव्ह्यूज्' हे अशा नव्या प्रायोगिक नाटकांचेच आहेत. माझी धारणा आहे की आजची प्रायोगिक रंगभूमी ही उद्याची व्यावसायिक रंगभूमी आहे. नव्या प्रयोगांबाबत मी पक्षपाती आहे. माझ्या समीक्षणांपैकी अवघी एक-तृतियांश समीक्षणं व्यावसायिक नाटकांची असतात, तर बहुतकरून दोन-तृतियांश समीक्षणं हौशी, प्रायोगिक, नव्या नाट्यप्रयोगांबद्दल असतात. मी एक वेळ डॉ. लागूंच्या व्यावसायिक नाटकांबद्दल फारसं लिहिणार नाही; पण त्यांच्या 'उद्ध्वस्त धर्मशाळे 'सारख्या प्रायोगिक नाटकाबद्दल अगदी आवर्जून जरूर लिहीन. अनुकूलच लिहीन, असं नाही; पण माझ्या समजुतीप्रमाणे विस्तारानं लिहीन. माझा अभिप्राय कदाचित् प्रतिकूल पण असेल, नाटकाला न्याय देण्याच्या यत्नात मी सदैव असतो-' पपा.

-' प्रायोगिक रंगभूमीबद्दलची तुमची ही आस्था योग्य आहेच. नव्या प्रयोगांच्या बाजूनं तुम्ही नेहमीच असता. किंबहुना मराठीतल्या सर्व प्रकारच्या नव्या नाटकांचे प्रवर्तक तुम्हीच आहात, असं म्हटलं जातं; पण तुम्हाला ममत्व असणाऱ्या या रंगभूमीवरसुद्धा काही गैरप्रकार चालतात, हे अमान्य करून चालणार नाही-' मी.

-' हो. अनेक वेळा तथाकथित 'नवेपणा 'चं आंधळं अनुकरण केलं जातं, ते जरूर अनिष्ट असतं. अशा अपप्रवृत्तींचा मी नेहमीच निषेध करीत आलो आहे-' पपा.

-' तुम्ही मघा म्हणालात की आजची प्रायोगिक रंगभूमी ही

उद्याची व्यावसायिक रंगभूमी आहे. प्रायोगिक रंगभूमी आणि हौशी रंगभूमी यांत नेमका फरक काय आहे ? हौशी रंगभूमीला नाटकाच्या एकूण भवितव्याच्या दृष्टीनं स्थान काय आहे ?'–
–मी.

' हौशी नाटकवाले जुन्याच नाटकांचे डिट्टो प्रयोग केवळ हौस म्हणून करतात, तर प्रायोगिकवाल्यांची, त्यांना अभिप्रेत असलेल्या नव्या नाटकाशी कुठे तरी निष्ठा गुंतलेली असते· या निष्ठेतूनच नंतरचा व्यावसायिक रंगमंच उभा राहतो. आपल्या प्रयत्नात, धडपडीत प्रायोगिक मंडळी नेहमी यशस्वी होतातच असं नाही. ते त्यात कदाचित् गारदही होतात. बट् दॅट् डझंट् मच् मॅटर. कारण हे ' बळी'च उद्याच्या थिएटरच्या पायाचे दगड ठरतात. काल ' वेड्याचं घर उन्हात–' लिहिलं, म्हणूनच आजचा कानेटकर उभा आहे. डॉ. लागूंनी सिनेमा–नाटकात यश मिळवलं; पण तरी त्यांनी प्रायोगिक रंगमंचाशी जुळवलेल्या निष्ठेचा धागा तुटू दिला नाही. आपल्याकडेच नाही, तर जागतिक कीर्तीचे इब्सेन, शॉ, ओ'नील हे नाटककारही प्रायोगिक रंगभूमीतूनच उदयाला आलेले आहेत. काही तरी नवीन करण्यावरची आणि जे करायचं त्यावरची असीम निष्ठा हे प्रायोगिक रंगभूमीचे सामर्थ्य आहे. प्रायोगिक रंगभूमीवर कोणी ' बान्द ' करतात, ते याच निष्ठेतून. कदाचित् त्यात ते अपयशीही होत असतील पण ते ग्लोरियस फेल्युअर आहे. शेक्स्पिअरने म्हटलं आहे की–नॉट् फेल्युअर, बट् लो एम् इज् क्राइम् ! एखादा अचाट नवा प्रयोग करताना–ते नाटक लिहिणारांच्या अंगी, बसवणारांच्या अंगी फार मोठं धैर्य असावं लागतं–' पपा.

–' मग हे धैर्य तुम्हाला कितपत आढळून येतं ? प्रायोगिक रंगभूमीची एकूण परिस्थिती आशादायक आहे का ?–' माझा प्रश्न.

' साधं उदाहरण देतो. आज सरकारी स्पर्धेत होणाऱ्या नाटकांपैकी सुमारे पाउणशे-ऐंशी टक्के नाटकं एकदम तद्दन नवीकोरी असतात. स्पर्धेच्या पहिल्या काही वर्षी त्या वेळची लोकप्रिय नाटकं–' उद्याचा संसार ' सारखी–बक्षिसं मिळवायची. आज त्यांच्या जागी बहुतांशी नवीनच नाटकं असतात. ही केवढी तरी मोठी ॲक्टिव्हिटी आहे. ' इट् इज ए सॉर्ट ऑफ ए रिव्होल्यूशन. तुमच्या नाशकासारख्या ठिकाणी सुद्धा अनेक नव्या नाटकांचे प्रयोग दरसाल झडतात. नव्या नाटकांविषयीची ही जिज्ञासा–निष्ठा मोलाची आहे. म्हणूनच एखादा नवा प्रयोग फारसा चांगला वठला नाही तर ' प्रयोग बेकार ' हे मी लिहीत असलो तरी त्याबरोबरच ' प्रयोग केला ही चांगली गोष्ट ' हे सुद्धा न चुकता लिहीत असतो–' पपा.

' ठीकं आहे. पण तुमच्या या सर्व प्रचंड लिहिण्याचा किंवा एकूण सगळ्याच समीक्षणांचा उपयोग कितपत होतो ? आपण उदाहरण घेऊनच बोलू या. ' ती फुलराणी–' या नाटकावर तुम्ही प्रतिकूल मत व्यक्त केलेले आहे. मात्र लोकांना ते नाटक खूप आवडतं. लोकांची त्या नाटकाला गर्दी होते. मग हजारो प्रेक्षकांचं बरोबर म्हणायचं की तुमच्यासारख्या समीक्षकाचं एकट्याचं बरोबर म्हणायचं ?'– माझा प्रश्न.

–' त्याचं असं आहे की पी. एल्. चा प्रेक्षकवर्गावर प्रभाव आहे. काही प्रमाणात सतीश दुभाषींचाही प्रभाव आहे. म्हणून लोक ' ती फुलराणी –' पाहतात. पण पुन्हा गंमत अशी की तेच लोक पी. एल. च्याच ' सारी रात ' ला मात्र गर्दी करीत नाहीत ! ' लोकांनी गर्दी करणं ' याला नाटकाच्या इतिहासाच्या दृष्टीनं फारसा अर्थ नाही. आज बर्नार्ड शॉ हा युगप्रवर्तक नाटककार समजला जातो; पण त्याच शॉला ' ब्रॉड्वे ' किंवा ' वेस्टेंड ' वर पाचपंचवीस वर्षं प्रवेश नव्हता. ' ती फुलराणी–' ला लोक जातात. माझा प्रश्न आहे की लोक ' शोले ' या फालतू सिनेमाला देखील गर्दी का करतात ? जागतिक कीर्तीच्या दहा महान दिग्दर्शकांना त्यांच्या लेखी एका श्रेष्ठ दिग्दर्शकाचं नाव सुचवायला सांगण्यात आलं होतं. त्या दहांपैकी नऊ जणांनी सत्यजित रे ह्यांचं नाव सुचवलं ! दहावे रे हे स्वतःच होते ! ! पण त्याच सत्यजित रे यांच्या सिनेमाच्या एका शोसाठी अख्ख्या मुंबईत थिएटर मिळत नाही ! सिनेमाच्या इतिहासात नाव राहील ते सत्यजित रे ह्यांचं ! लोकप्रिय-गल्लाभरू सिनेमे काढणारांचं नाव नाही राहणार ! नाटकाच्या बाबतीतही हेच आहे. ग्रेट प्ले आणि पॉप्युलर प्ले यांतला फरक समजून घ्यायला हवा. साधारण मानानं लोकांची वृत्ती नेहमी अधोगामी असते. ते पाण्याप्रमाणे बहुधा खालची पातळी शोधतात [हे मला माहीत असतं. पक्केपणी माहीत असतं. म्हणून तर केव्हा केव्हा वैतागानं मी लिहितो की–अमुक एक नाटक इतकं भिकार आहे की ते पन्नास आठवडे देखील चालेल ! आणि–अमुक एक नाटक इतकं चांगलं आहे की, ते एक आठवडाभर-सुद्धा चालणार नाही.'–पपा.

–' तुमच्या या मतांशी किती लोक सहमत होतात?–' मी.

–' जाणकारांना माझी मतं बहुतकरून पटतात. उदाहरणार्थ, प्रा. वा. ल. कुलकर्णी ' ती फुलराणी ' च्या प्रयोगाला कोणाच्या तरी


**या वर्षीच्या प्रवासवर्णनात 'आनंदाच्या दाही दिशा' हे पुस्तक सर्वोत्कृष्ट ठरेल यात शंका नाही.**

–शान्ता शेळके
ललित, सप्टेंबर १९७५

**आनंदाच्या दाही दिशा** — **मूल्य : १० रुपये**
**रवींद्र पिंगे** — **राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

आग्रहाखातर गेले खरे; पण नाटक पाहिल्यावर ते मला म्हणाले की– ' तुम्ही त्या नाटकाबद्दल लिहिलं आहे ते रास्त आहे.' त्यापूर्वी केव्हा तरी वा. ल. म्हणाल्याचं आठवतं की–' माधवराव, तुमचा एक पुस्तकावरचा रिव्ह्यू वाचला आणि त्याच पुस्तकावरचा मी लिहि-लेला रिव्हियू चक्क फाडून टाकला ! '–पपा.

–' म्हणजे वा. ल. यांच्यासारखा एखादा विद्वान तुमच्याशी सहमत होतो; मग इतर हजारो प्रेक्षकांचं काय ? का तुम्ही केवळ बुद्धिवाद्यांसाठीच लिहिता ?–' मी.

–' ह्यात तथ्य आहे. पहा, तरी देखील लोकांनी माझी समीक्षणं वाचावीत, माझ्या मतांचा विचार करावा असं मलाही वाटतं, नाही असं नाही; पण त्यातही जरा वेगळा प्रश्न आहेच–की सर्वसामान्य माणसं नाटक-सिनेमा का पाहतात ? बॉबी हा सिनेमा ते ऋषि-कपूरच्या जागी स्वतःला पाहण्यासाठी पाहतात. नाटकसिनेमात हे असं आयडेंटिफिकेशन कुठे तरी जरूर असतं. प्रेक्षकांच्या वयाच्या फॉर्म्युल्यानुसार ते सामान्यतः दहा-बारा वर्षे वयाचे असतात ! म्हणजेच प्रेक्षकवर्ग हा एकंदरीत अप्रौढ असतो. ' वाहतो ही दूर्वांची जुडी ' चे हजार प्रयोग होतात, ' श्यामची आई ' ला लोक जातात–ते ' सुभाष ' शी, ' श्याम ' शी स्वतःचं आयडेंटिफिकेशन करण्याची प्रेक्षकांची इच्छा असते म्हणून ! माझ्या मते–लोकप्रियता आणि गुणवत्ता ह्यांचं प्रमाण नेहमीच नाही, पण पुष्कळ वेळा अगदी व्यस्त असतं. लोकांना इंटेलेक्चुअल नव्हे, तर वासनांची एंजॉयमेंट हवी असते–' पपा.

–' म्हणजे, तुमच्या मते लोकांना खऱ्याखुऱ्या ग्रेट गोष्टी अजीबातच नको असतात का ?'–मी.

–' मी वा. लं. च्या, नंतरच्या ' प्रेयस् आणि श्रेयस् ' बद्दल फार पूर्वीपासून एक प्रयोग करायचो. वेगवेगळ्या कॉलेजांतून मी व्याख्यानं देण्यासाठी किंवा वाङ्मयमंडळाच्या उद्घाटनासाठी जायचो, त्या वेळी विद्यार्थ्यांकडून दोन प्रश्नांची उत्तरं लेखी मागायचो. पहिला प्रश्न असायचा–तुमचा आवडता लेखक कोण ? दुसरा प्रश्न असायचा–तुमचं आवडतं पुस्तक कोणतं ? मुलं आवडता लेखक म्हणून हमखास लोकमान्य टिळकांचं नाव लिहायचे ! आणि अर्थातच आवडतं पुस्तक–गीतारहस्य ! ! किंवा–वा. म. जोशी हे आवडते लेखक, ' रागिणी ' हे आवडतं पुस्तक ! ! ! हे विद्यार्थी प्रत्यक्षात मात्र अर्नाळकर नाही तर काकोडकर वाचणारे असतात ! आता बावा कदम ! कारण त्यांना तेच लेखक प्रिय असतात. हे झालं त्यांचं ' प्रेयस् ' पण लोकमान्यांचा वा गीतारहस्याचा, वामनराव जोशींचा वा रागिणीचा ग्रेटनेस् त्यांना अन्कॉन्शिअस्ली जाणवत असतो. हे त्यांचं ' श्रेयस् '–'–पपा.

–' पण तुमच्या ह्या सिद्धांतानं हेच सिद्ध होतं की ग्रेट नाटकांऐवजी पॉप्युलर नाटकंच लोक पाहतात–तीच लोकांना आवडतात, प्रिय असतात. म्हणजे अखेर तुम्ही तुमची मतं लोकांवर लादू शकत नाही–'–मी.

–' होय, ते तर खरंच आहे. लोकांच्या रुचीवर कोण काय लादणार ?'–पपा.

–' तर मग तुम्ही नाट्यसमीक्षणं लिहिण्याचा अट्टाहास का करता ?'–मी.

–' माझ्या समीक्षणात ज्याला तथ्य सापडतं असा हजारात एक माणूस जरी मला आढळला, तरी मला संपूर्ण समाधान आहे–' पपा.

–' पण याचा अर्थ–लोक गेले मसणात, माझं तेच खरं–असा होत नाही का ?'–मी.

–' तसं नाही. माझं जसं एक मत आहे, तशी प्रेक्षागृहातल्या आठशे जणांची आठशे मतं असू शकतात. मी माझं मत व्यक्त करतो, त्याचप्रमाणे इतरांनीही आपापली मतं सांगावीत. त्यांचे हात कोणी धरले आहेत ? मेनी मेन्, मेनी माइंड्स्. व्यक्ती तितक्या प्रकृती हे तर खरंच आहे. मतस्वातंत्र्य मी जरूर मानतो...'

...दरम्यान आम्हा दोघांनाही चहाची आठवण झालेली असते, तल्लफ आलेली असते. पपांच्या घरचे इतर सर्वचजण बाहेर गेलेले असतात–' चहा घेऊ या ना ?' असं पपा विचारतात. मी धड हो म्हणत नाही आणि नाही पण म्हणत नाही. पपा म्हणतात–' आत किचनमधे बसू या–' आम्ही दोघे किचनमधे जातो. पपा गॅस पेटव-तात, चहाचं आधण ठेवतात, साखर-दूध-चहा टाकतात. आम्ही चहा उकळण्याची वाट पाहत राहतो. काही वेळानतर लक्षात येतं की गॅस संपला आहे आणि चहाच्या आधणाला तर अजून उकळी आलेली नाही; पण मला आपल्या हातचा चहा पाजण्याचा चंग बांधलेले पपा या अडचणीतूनही मार्ग काढतात ! ! तो असा की–न उकळलेला चहा पिऊन पहावा ! ! ! ...

...त्या चहाची टेस्ट अजूनही माझ्या जिभेवर रेंगाळते आहे ! ' लोकांच्या रुचीवर कोण काय लादणार ?' हे पपांचे शब्दही त्या-बरोबरच माझ्या कानात रेंगाळत आहेत ! ! ...

☐ ☐


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
रांजहंस प्रकाशन, पुणे ३०

# मुक्काम पुणे

पृष्ठ ८ वरून

प्राध्यापकांच्या आंदोलनानंतर सुधारित वेतनश्रेणी महाराष्ट्रातील प्राध्यापकांसाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही वेतनश्रेणी लवकरच लागू होईल असा जाणकारांचा अंदाज आहे.

पण सध्या चर्चा चालू आहे ती वेगळ्याच विषयावर. ज्या सेन–कमिटीच्या अहवालानुसार ही नवी वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्याच कमिटीने प्राध्यापकांचे ' वर्क लोड ' परीक्षापद्धतीबाबत काही शिफारसी केल्या आहेत. नवीन वेतनश्रेणीप्रमाणेच या शिफारसी लागू करण्याबाबत विचार चालू आहे.

पहिली महत्त्वाची शिफारस आहे प्राध्यापकांच्या ' वर्क लोड 'संबंधी. ४० तासांपैकी २० तास प्राध्यापकांनी प्रत्यक्ष शिकविले पाहिजे, अशी आहे. त्यानुसार सध्या १५ पीरिअड व ८ टयूटोरियल्स घ्यावी लागतात तर त्याऐवजी १८ पीरिअडस् व ६ टयूटोरियल घेण्याची सक्ती करण्याबाबत विचार चालू आहे.

काम करायला आमची ना नाही; परंतु सेन–कमिटीच्या या शिफारसीचा योग्य अन्वयार्थ लावण्यात आलेला नाही अशी प्राध्यापकांची तक्रार आहे. सेन–कमिटी किंवा यु. जी. सी. च्या ज्या काही शिफारसी आहेत त्या सर्व ' एज्युकेशनल रिफॉर्म ' डोळ्यांसमोर धरून केलेल्या आहेत. त्यात सध्याची ' लेक्चरबाजी ' कमी करून ' इंटरनल असेसमेंट ' व विद्यार्थ्यांचे ' ॲक्टिव्ह ' पार्टिसिपेशन ' अपेक्षित आहे. सेन–कमिटीने जे वर्किंग अवर्स धरले आहेत त्यात विषयाची तयारी, लेक्चर्स, टयूटोरियल्स, विद्यार्थ्यांना व्यक्तिगत मार्गदर्शन, कॉलेजच्या कल्चर ॲक्टिव्हिटीजमधील सहभाग या सर्वांचा समावेश केला आहे. सेन–कमिटीने, आठवड्यातील २० तास कॉलेजात प्राध्यापकाने उपस्थित असले पाहिजे असं म्हटलंय्; परंतु हे सर्व तास शिकविण्याचे आहेत असा त्यातून अर्थ काढणे योग्य होणार नाही असे प्राध्यापकांचे म्हणणे. शिकविण्याचे तास वाढविण्याचे अनेक परिणाम शक्य आहेत. शिकविण्याचा दर्जा, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देण्याला मिळणारा वेळ व प्राध्यापकांना भेडसावणारा बेकारीचा परिणाम, तास वाढविल्याने सध्या जितके प्राध्यापक निरनिराळ्या कॉलेजांत आहेत तेवढयांची गरज न लागून काही ज्यूनिअर लोकांना दुसरीकडे वळावे लागेल. अर्थात याबाबतीत अद्यापी निर्णय झालेला नसल्याने एका वर्गातील विद्यार्थी–संख्या कमी करून तुकडया वाढविणे, एका विषयाला असणाऱ्या तासांच्या संख्येत वाढ करणे वगैरे उपायही प्राध्यापक–संघटनांकडून सुचविण्यात आलेले आहेत.

सुधारित वेतनश्रेणी मिळणाऱ्या प्राध्यापकांना परीक्षांबाबतचे कोणतेही काम वेतन न मिळता करावे लागेल अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. त्यात परीक्षांचे पेपर काढणे, परीक्षा घेणे, पेपर्स तपासणे, मॉडरेटिंग या सर्व कामांचा समावेश आहे. या बाबतीतही सेनकमिटीच्या अहवालाचा अन्वयार्थ संबंधित परिस्थिती लक्षात न घेता काढल्याचा दावा प्राध्यापक–संघटनांनी केला आहे. त्यांचं म्हणणं असं की शिक्षणपद्धती, विद्यार्थ्यांच्या कुवतीचे मूल्यमापन याबाबतीतील या कमिटीच्या शिफारसी अंमलात आल्यावरच वरील तरतूद लागू होऊ शकते. कारण एकदा ' इंटरनल असेसमेंट 'चे महत्त्व वाढले की त्यानुसार तोंडी परीक्षा, आठवडी चाचण्या, चर्चा, परिसंवाद घेऊन वेळोवेळी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करावे लागेल. त्या वेळी त्या परीक्षांसाठी, वेगळे वेतन मिळू नये. तो प्राध्यापकांच्या डयूटीचा एक भाग आहे; परंतु १०० टक्के मूल्यमापन ज्या वेळी वार्षिक परीक्षेवर होते त्या वेळी त्याचे वेगळे वेतन का मिळू नये ?

१० + २ + ३ या नवीन शिक्षणक्रमानुसार १२ वीचे वर्ग तत्त्वतः शाळेकडे ठेवावे हे तत्त्वतः मान्य झाले असले तरी १२ वीचा अभ्यासक्रम व शाळेतील सोयी यांचा विचार करता पुढील वर्षी १२ वीची पहिली बॅच शाळेकडे ठेवावी की कॉलेजकडे ठेवावी याचा स्पष्ट निर्णय अद्यापी झालेला नाही. त्यात शहरी व ग्रामीण भागातील शाळा असा फरक अपरिहार्यपणे होणारच. या सर्वांचा परिणाम प्राध्यापकांवर होणार आहे. सध्या पुणे शहरात ११ वी आर्टला ७५० विद्यार्थी असून १२ वी आर्टसाठी जेमतेम ४०० विद्यार्थी उपलब्ध होतील. त्यांची विभागणी परत निरनिराळ्या कॉलेजमध्ये होऊन अतिशय कमी विद्यार्थी कॉलेजला मिळणार असून त्यामुळे तुकडयांची व अखेरीस प्राध्यापकांची संख्या कमी होण्याची शक्यता आहे.

' पुटा ' या प्राध्यापकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका नुकत्याच पुण्यात पार पडल्या. त्यांचे वैशिष्टय म्हणजे ज्या प्राध्यापकांनी आंदोलनाला पाठिंबा देऊन त्यात सक्रीय भाग घेतला ते मोठ्या संख्येने या वेळी निवडून आले तर ज्यांनी आंदोलनात मनापासून भाग घेतला नाही ती मंडळी बाजूला पडली. प्रत्येक महाविद्यालयाच्या मॅनेजिंग कमिटीचा प्राध्यापक-प्रतिनिधी निवडण्यासाठी निवडणुका पार पडल्या असून मोठ्या प्रमाणावर आंदोलनात भाग घेतलेल्या तरुण प्राध्यापकांची निवड झाली आहे.

◻



☐ पत्रकार ही भटकी जमात असते असा शेरा मंत्रीमहाशयांनी पुणे पत्रकार गृहरचना सोसायटीच्या भूमिपूजनाच्या वेळी मारला होता.

टिळक, आगरकर, खाडिलकर यांची परंपरा असलेली पत्रकारिता हा आजच्या काळात एक 'प्रोफेशन' झाला असला तरी 'घर पहावे बांधून' असे-सहजपणे म्हणण्याचे दिवस काही श्रमिक पत्रकाराला अद्यापी आलेले नाहीत.

तेव्हा एकत्र येऊन काही जमतं का पहावे म्हणून स्थापन झालेल्या या सोसायटीला जमीन मिळूनही अजून पाया खणण्याचे भाग्य काही पहायला मिळालेले नाही.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनिमित्त पुण्यात आलेल्या मुख्य मंत्र्यांनी पत्रकार-गृहरचना सोसायटीच्या कामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले आहे. पुण्यातील पत्रकारांची घरे लवकर उभी राहण्याच्या दृष्टीने शक्य व योग्य ते सहाय्य मी जरूर देईन असे आश्वासन त्यांनी दिले आहे. स्वयंपाकघरात ओटा असावा की नाही, खिडक्या दोन असाव्यात की असू नयेत अशा क्षुल्लक कारणांवरून वादावादी करीत न बसता सर्व पत्रकारांनी जर सध्याच्या कार्यक्षम पदाधिकाऱ्यांना एकदिलाने सहाय्य केले तर घरे बांधण्याचे स्वप्न साकार होण्यास फारसा वेळ लागणार नाही. ☐

☐ हवामानखात्यालाही बुचकळ्यात टाकणाऱ्या पावसाने मागील आठवड्यात पुणेकरांना चांगलेच झोडपून काढले. कित्येक वर्षांत झालेल्या ताशी पावसाचे प्रमाणवेगाचे उच्चांक मोडणाऱ्या या पावसाने झोपडपट्टीवासीयांची मात्र त्रेधातिरपट उडविली. रस्तोरस्ती गुडघाभर पाणी जेव्हा वाहू लागले त्या वेळी जाताजाता या पावसाने पानशेतच्या पुराची कटू आठवणही करून दिली.

☐ ☐

# विद्यार्थिनींचा हिवाळी वर्ग : नोव्हेंबर १९७५

विद्यार्थी साहाय्यक समिति व इन्व्हेस्टमेंट इन् मॅन या संस्थांतर्फे गेल्या चार वर्षांत उन्हाळ्याच्या व हिवाळ्याच्या सुट्ट्यांमधून महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी विशेष अभ्यासवर्ग पुणे, सोलापूर, श्रीपूर, ठाणे व विलेपार्ले येथें घेण्यात आले.

या वर्गाचे सूत्र व्यक्तिमत्त्वविकास हे होते. महाविद्यालयीन शिक्षणास पूरक असा अभ्यासक्रम पंधरा दिवसांच्या कालात योजिला जातो. विविध व उपयुक्त विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चा, प्रात्यक्षिके, तसेच योगासने, खेळ, छंदशिक्षण व समाजसेवा करणाऱ्या संस्थांचा परिचय असा वर्गाचा कार्यक्रम असतो.

येत्या हिवाळ्याच्या सुटीतील वर्ग रविवार दि. ९ ते रविवार दि. २३ नोव्हेंबर १९७५ या काळात व्हावयाचा आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना या वर्गासाठी प्रवेश मिळेल. अन्य कार्यक्रमाबरोबरच या वर्गात पुण्याजवळील एका खेडेगावात श्रमदानाच्या कामाची योजना आहे.

वर्गाच्या भोजन व निवासाप्रीत्यर्थ शुल्क रु. ५०/– असेल. छंदवर्गाच्या साहित्यासाठी सुमारे रु. १५/– लागतील. आर्थिक परिस्थिती सामान्य असणाऱ्या विद्यार्थिनींना या दरात आवश्यक वाटल्यास सवलत मिळेल. वर्गाचे काळात रहाणे-जेवणे व अन्य कार्यक्रम विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थिनी–गृहावर होतील.

प्रवेश–अर्ज भरून पाठविण्याची शेवटची तारीख शनिवार दि. १ नोव्हेंबर १९७५ ही आहे. अर्ज पोस्टाने मागविल्यास पत्रासोबत ५० पैशांची तिकिटे पाठवावीत.

पत्रव्यवहार व भेटण्याचा पत्ता–
वि. सा. समितीचे विद्यार्थिनीगृह,
११३७ / १३, मॉडेल कॉलनी,
पोलिसमैदानाजवळ, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे ५
वेळ : सायंकाळी ५ ते ७.

**निर्मला पुरंदरे**
संचालिका, हिवाळीवर्ग

Then in the name of democracy – let us use that power – let us all unite. Let us fight for a new world – a decent world that will give us a chance to work – that will give youth a furure and old age a security...

By the promise of these things, brutes have risen to power. But they lie ! They do not fulfill that promise. They never will ! Dectators free themselves, but they enslaves the people...

Soldiers, in the name of demcoracy, let us unite...

एका विदूषकाचे हे भाषण....
' डिक्टेटर ' या चित्रपटामधील हिटलरच्या भूमिकेतील
या विदूषकाचे.
हा विदूषक होता चार्ली चॅप्लिन.
चित्रपटमाध्यमाचे जबरदस्त सामर्थ्य जाणणारा विसाव्या
शतकातील हा उत्कृष्ट निर्माता. उत्कृष्ट अभिनेता आणि
उत्कृष्ट दिग्दर्शक.

असामान्य प्रतिभेच्या या महान कलावंतालाही स्वतःच्या राजकीय,
सामाजिक मतांसाठी अमेरिकेतून हद्दपार व्हावे लागले.
चॅप्लिनच्या रंगेल जीवनाबरोबरच त्याच्या सामाजिक
जाणिवेचे दर्शन घडवणारी खळबळजनक जीवनकहाणी.

# माणूस दिवाळी अंक